दैनिक राष्ट्रसह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ८ वे । पाने ८ । मुल्य रू. ५.०० । अंक २९ । रविवार ८ नोव्हेंबर २०२६

। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

अहिल्यानगर • जळगाव • धुळे • नंदुरबार • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • धाराशिव • लातूर • नांदेड • परभणी • हिंगोली • अमरावती • अकोला • यवतमाळ • बुलढाणा • वाशिम • नागपूर • वर्धा • भंडारा • गोंदिया • चंद्रपूर • गडचिरोली • मुंबई • ठाणे • पालघर • रायगड • रत्नागिरी • सिंधुदुर्ग • पुणे • सातारा • सांगली • कोल्हापूर • सोलापूर • नाशिक

शेवगाव-पैठण रस्त्यावर अपघात

तिघे तरुण जागीच ठार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

शेवगाव : शेवगाव – पैठण रस्त्यावर खानापूर शिवारात भरधाव वेगाने जाणारी मालट्रक आणि पल्सर मोटरसायकल यांची धडक होऊन झालेल्या भीषण अपघातात मोटरसायकलवरील तिघे तरुण जागीच ठार झाले. हा अपघात शुक्रवार (दि. ६) रोजी सायंकाळी ६:३० वाजण्याच्या सुमारास घडला. अपघातात मयूर झालेले दिघे तरुण शेवगाव तालुक्यातील खानापूर येथील रहिवास होते.

या अपघातात तिघा तरुणांच्या झालेल्या दुर्दैवी मृत्यूमुळे परिसरात सर्वत्र हळूहळू



व्यक्त होत आहे.

या अपघाताची सविस्तर माहिती अशी की, शुक्रवार दि. ६ रोजी सायंकाळी ६:३० वाजण्याच्या सुमारास शेवगाव पैठण रस्त्यावरील घोटण जवळ भरधाव वेगाने येणाऱ्या उसाच्या मोकळ्या ट्रकने (क्र. एम एच १५ एच एच ३४ ६५)पल्सर मोटर सायकलला (क्र. एम एच १६ डी वाय ३८ ९९)जोराची धडक **(पान ४ वर)**

नगराध्यक्षांच्या दिराने लिपिकाला भर कार्यालयात चोपले

नगरपरिषदेत टेंडरमधील त्रुटी दाखवल्याने वाद; गुन्हा दाखल

शेवगाव : शेवगाव नगरपरिषदेत सत्ताधाऱ्यांच्या अरेरावी आणि दादागिरीचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. नगरपरिषदेच्या १० लाख रुपयांच्या विद्युत साहित्य पुरवठा निविदेतील तांत्रिक त्रुटी दाखवून नियमबाह्य टेंडरला आक्षेप घेतल्याचा राग मनात धरून, नगराध्यक्षांचे दीर नंदकुमार मुंढे यांनी पालिका कार्यालयात घुसून विद्युत विभागाचे लिपिक केतन वसंत मुरदारे यांना बेदम मारहाण करत शासकीय कामात अडथळा निर्माण केला. याप्रकरणी शेवगाव पोलीस ठाण्यात नंदकुमार मुंढे यांच्यासह त्यांच्या साथीदारांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भर कार्यालयात शासकीय कर्मचाऱ्यावर झालेल्या या हल्ल्यामुळे पालिका वर्तुळात **(पान ४ वर)**

खा. निलेश लंके थोरातांच्या भेटीला

जिल्हा बँकेच्या सत्तासमीकरणांची उत्सुकता शिगेला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत एकमेकांविरोधात निकराची लढत देणाऱ्या जिल्ह्यातील दिग्गज नेत्यांच्या भेटीगाठींचे सत्र आता सुरू झाले आहे. पालकमंत्री



राधाकृष्ण विखे यांनी शुक्रवारी विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांची अचानक भेट घेतल्यानंतर आज शनिवारी खासदार तथा बँकेचे नवनिर्वाचित संचालक नीलेश लंके यांनी संगमनेर येथे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांची भेट घेतली. अवघ्या चार दिवसांवर येऊन ठेपलेल्या जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदाच्या निवडीच्या पार्श्वभूमीवर या भेटीगाठींना विशेष राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे.

दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध व्हावी, यासाठी राजकीय विरोधक असलेले बाळासाहेब थोरात आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी एकत्र येत प्रयत्न केले होते. जिल्ह्यातील अनेक नेत्यांनीही या दोघांच्या पुढाकाराला साथ दिली. मात्र, विधान परिषदेचे सभापती **(पान ४ वर)**

लक्ष्मी पूजन आणि दिवाळीच्या शुभेच्छा..!



थोर स्वातंत्र्य सैनिक भाऊसाहेब थोरात यांनी संगमनेर तालुक्यात विकासाचा मंत्र घुमवून शेतकरी, कष्टकरी, शेतमजूर व कामगार यांच्यासाठी उभारलेली प्रतिसृष्टी

अमृत उद्योग समुह

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात
(थोर स्वातंत्र्यसेनानी)

दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

अथक 65 वर्षांची रचनात्मक वाटचाल

सहकारातील अग्रगण्य संस्था

- सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना लि, अमृतनगर
- संगमनेर तालुका सहकारी दूध उत्पादक व प्रक्रिया संघ मर्यादित, संगमनेर
- अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्था, अमृतनगर
- सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि, अमृतनगर
- सौ. मथुराबाई भाऊसाहेब थोरात सेवाभावी ट्रस्ट
- संगमनेर शेतकी संघ लि,संगमनेर
- संगमनेर ॲग्रीकल्चर प्रोड्युस ट्रान्सपोर्ट कंपनी प्रा. लि, अमृतनगर
- राजहंस ॲग्रीकल्चर ट्रान्सपोर्ट कंपनी प्रा. लि, अमृतनगर
- संगमनेर ता. ॲग्रीकल्चर प्रोड्यूस प्रोसेसिंग मार्केटिंग को-ऑप सोसा. मर्या
- गरुड सहकारी कुक्कुट पालन व्यावसायिक संस्था लि, घुलेवाडी
- सह्याद्री बहुजन विद्या प्रसारक समाज, संगमनेर
- हरिश्चंद्र सहकारी पाणी पुरवठा संस्थांचे सहकारी फेडरेशन



लोकनेते
मा.आ. बाळासाहेब थोरात
सदस्य : अखिल भारतीय राष्ट्रीय कांग्रेस वर्किंग कमिटी
मा. महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य/ विधीमंडळ गटनेते









01 जलक्रांती आणि शेतीचा कायापालट :

- **निळवंडे प्रकल्पाची भाग्यरेषा:** निळवंडे ऊर्ध्व प्रवरा प्रकल्पाची उर्वरित सर्व कामे आता गतीने मार्गी लागत आहेत.
- **भोजापूर डावा कालवा व पूर चारी दुरुस्ती** आणि नूतनीकरणाच्या कामांसाठी तर दोडी शाखा कालव्यांच्या दुरुस्तीसाठी भरघोस निधी.
- कालव्यांद्वारे लाभक्षेत्रातील सर्व गावांना, **शेतकऱ्यांना हक्काचा पाणीपुरवठा सुरू.**
- **शेतकऱ्यांना सौरऊर्जेचा आधार:** संगमनेर तालुक्यात तब्बल ३,०३९ हून अधिक सौर कृषी पंप यशस्वीपणे कार्यान्वित करून शेतकऱ्यांना थेट आणि मोफत वीज मिळवून दिली.

02 वीजपुरवठा सक्षमीकरण

- शेतकऱ्यांची चिंता मिटली. जळलेले अथवा **नवीन ट्रान्सफॉर्मर (रोहित्रे) मोफत कार्यान्वित करण्यात येत आहेत,** ज्यामुळे शेतकऱ्यांचा थेट मोठा आर्थिक फायदा झाला आहे.
- **वीज उपकेंद्रांतील रोहित्रांची क्षमता दुप्पटीने** वाढवून वीज खंडित होण्याच्या समस्येवर कायमस्वरूपी मात.

03 रस्ते, पूल आणि कनेक्टिव्हिटी:

- **पुलांच्या बांधकामासाठी करोडोंचा निधी:** नद्यांवरील पुलांच्या उभारणीसाठी मोठा निधी उपलब्ध. म्हाळुंगी नदीवर पक्क्या पुलाचे लोकार्पण संपन्न, तर इतर महत्त्वाच्या पुलांची कामे अंतिम टप्प्यात.
- **ग्रामीण व शेत रस्त्यांचे पुनरुज्जीवन :** ग्रामीण रस्ते विकास व मजबुतीकरण अंतर्गत अनेक निकृष्ट रस्त्यांचे नूतनीकरण करण्यात आले.
- **शेत शिवारापर्यंत थेट पोहोच :** खेड्यापाड्यात आणि शेत शिवारात थेट पोहोचण्यासाठी 'शेत पाणंद रस्ते' उपलब्ध करून देण्यात येणार
- **शहरी रस्ते विकास:** संगमनेर नगरपरिषद क्षेत्रातील मुख्य व अंतर्गत रस्ते विकासकामांसाठी करोडोंचा निधी मंजूर. कामे आता प्रगतीपथावर.
- **एसटी गाड्यांचे नवे वैभव:** प्रवाशांच्या सेवेसाठी संगमनेर आगाराला १५ लालपरी बस आणि २५ शिवाई इलेक्ट्रिक बस

04 गाव तिथे विकास :

- **प्रकाशमय संगमनेर:** संगमनेर शहर व ग्रामीण भागात रात्रीच्या सुरक्षेसाठी आणि उजेडासाठी **'हायमास्ट दिवे' बसविण्यासाठी करोडोंचा निधी उपलब्ध** करून देण्यात आला.
- **सर्वसमावेशक विकास:** आदिवासी भाग आणि दलित वस्त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मूलभूत व पायाभूत सुविधांसाठी स्वतंत्र निधी उपलब्ध.
- **सामुदायिक विकास:** गावागावांमध्ये सांस्कृतिक, सामाजिक व शासकीय बैठकांसाठी सुसज्ज सभागृहांची निर्मिती.
- **धार्मिक व सांस्कृतिक वारसा:** परिसरातील प्रमुख मंदिरांचा विकास आणि मंदिर परिसरांच्या सुशोभीकरणासाठी विशेष निधीची तरतूद.

05 रोजगार, आरोग्यसेवा आणि कायदा-सुव्यवस्था :

- **औद्योगिक क्रांतीचे पाऊल:** संगमनेर येथे रोजगार निर्मितीसाठी MIDC (औद्योगिक वसाहत) संदर्भातील पाठपुरावा आता अगदी अंतिम टप्प्यात.
- **गुन्हेगारीमुक्त आणि सुरक्षित परिसर:** अवैध धंद्यांवर कडक कारवाई आणि अवैध कत्तलखान्यांवर धडक मोहीम राबवून तालुक्यात कायदा व सुव्यवस्थेचे राज्य निर्माण केले.
- महाराष्ट्र शासनाच्या **मुख्यमंत्री सहाय्यता निधी अंतर्गत अनेक गरजू रुग्णांना मदत मिळवून दिली** व देत आहोत.
- **कामगारांसाठी ESIC सेवा दवाखाना मंजूर** करून आणला.



विकसित, सुरक्षित, समृद्ध संगमनेरच्या सर्वांगीण **विकासासाठी** आणि जनतेच्या **सेवेसाठी सदैव कटिबद्ध!**
– आमदार अमोल खताळ पाटील

विकासाच्या महामार्गावर धावणारं,
समृद्ध संगमनेर!

दैनिक राष्ट्र सह्याद्री
आवाज जनतेचा... प्रयत्न जनहिताचा...
वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा..!

राष्ट्र सह्याद्रीच्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा!

मालपाणी उद्योग समूह

MALPANI



मालपाणी पॅलेस ॲण्ड मालपाणी क्लब ॲण्ड रिसॉर्ट
अकोले रोड, संगमनेर, जि.अ.नगर, फोन: 02425-228851/ 98812 46144



||Sai Teerth||
THEME PARK, SHIRDI
www.saiteerth.in
9767840000 / 9767540000

Wet 'n Joy
■ Water Park ■ Amuesment Park
Lonavala - Shirdi
Wet 'n Joy Water Park, Shirdi
www.shirdi.wetnjoy.in/
9527650000/9527640000/9850586650
Wet 'n Joy Water Park & Amusement Park, Lonavala
www.lonavala.wetnjoy.in
9112268080 / 9112278080

Imagicaa
■ Theme Park ■ Water Park
■ Snow Park ■ Hotel
Khopoli-Pali Road, Near Lonavala
Khalapur, 410 203
www.imagicaaworld.com
022 – 62552929

Malpani Group's Ventures,
GIRIRAJ ENTERPRISES, Sangamner/Pune

सहकाररूपी गोकुळचे होणार हस्तिनापूर !

सहकाराच्या स्वायत्ततेवर राजकीय अतिक्रमण; सभासदांच्या अधिकारांपेक्षा सत्तेचे गणित मोठे ठरणार का?

सहकार म्हणजे परस्परांच्या सहकार्याने सामूहिक प्रगती साधण्याची व्यवस्था. ग्रामीण महाराष्ट्राच्या आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक परिवर्तनाचा पाया याच सहकाराने घातला. साखर कारखाने, दूध संघ, सहकारी बँका, सूत गिरण्या अशा संस्थांच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ मिळाले. मात्र, सहकाराच्या याच व्यवस्थेवर राजकीय वर्चस्व प्रस्थापित करण्याची स्पर्धा वाढत गेली आणि सहकाराचे राजकारण झाले. आता राज्य सरकारने सहकारी संस्थांवर पाच नामनिर्देशित संचालक नियुक्त करण्याचा आणि त्यातील चार जणांना मतदानाचा अधिकार देण्याचा घेतलेला निर्णय या राजकीय हस्तक्षेपाला नवी दिशा देणारा ठरत आहे. कोल्हापूरच्या गोकुळ दूध संघातील सत्तासंघर्षाच्या पार्श्वभूमीवर या निर्णयाकडे पाहिले असता त्यामागील हेतूविषयी प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे.

राज्य मंत्रिमंडळाने सहकार कायद्यातील दुरुस्तीला मान्यता दिल्यानुसार ५०० कोटी रुपयांपेक्षा अधिक उलाढाल असलेल्या सहकारी संस्थांवर पाच नामनिर्देशित संचालक नियुक्त करण्याची तरतूद करण्यात येत आहे. यातील एका संचालकाला मतदानाचा अधिकार नसेल, तर उर्वरित चार संचालकांना मतदानाचा अधिकार असेल. वरकरणी मोठ्या सहकारी संस्थांच्या व्यवस्थापनात तज्ज्ञांचा सहभाग वाढविण्याचा हा प्रयत्न असल्याचे सांगितले जाऊ शकते. मात्र, या निर्णयामुळे सभासदांनी निवडून दिलेल्या संचालक मंडळाच्या अधिकारांवर गदा येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या निर्णयाचे खरे राजकीय संदर्भ कोल्हापूरच्या गोकुळ दूध संघात दडलेले आहेत. सुमारे तीन हजार कोटी रुपयांची उलाढाल आणि लाखो दूध उत्पादक सभासदांशी संबंधित असलेल्या या संस्थेच्या निवडणुकीत महायुतीला १२, तर सतेज पाटील यांच्या नेतृत्वाखालील गटाला १३ जागा मिळाल्या. त्यामुळे गोकुळवर कोणाची सत्ता राहणार, हा प्रश्न निर्माण झाला. मंत्री हसन मुश्रीफ यांच्यासारख्या वजनदार नेत्याला पराभवाचा सामना करावा लागला. महायुतीला बहुमत मिळवता आले नाही. अशा परिस्थितीत सहकारी संस्थांवर शासन नियुक्त संचालक आणण्याची मागणी पुढे आली. मंत्री चंद्रकांत पाटील यांनीही यासंदर्भात शासनाकडे पत्रव्यवहार केल्याचे समोर आले. त्यानंतर मंत्रिमंडळाने घेतलेला निर्णय आणि गोकुळमधील सत्तेची कोंडी यांचा परस्परसंबंध असल्याचा आरोप विरोधकांकडून केला जात आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मात्र सरकारला गोकुळवर कब्जा करायचा नसल्याचे स्पष्ट केले आहे. गोकुळ ही एका जिल्ह्यापुरती संस्था असून तिच्यासाठी राज्य सरकार आतुर असल्याचे समजण्याचे कारण नाही, असे सांगतानाच दोन्ही गटांनी एकत्र बसून प्रश्न सोडवावा, असा सल्लाही त्यांनी दिला. अध्यक्षपदाच्या निवडीत कोरमचा प्रश्न निर्माण झाल्याने शासन नियुक्त सदस्यांची गरज भासल्याचे त्यांचे म्हणणे आहे. तीन वेळा निवडणूक होऊ शकली नाही, तर जिल्हा निबंधकांना अधिकार प्राप्त होतात, असेही त्यांनी स्पष्ट केले. मुख्यमंत्र्यांची ही भूमिका समजून घेतली तरी मूळ प्रश्न अनुत्तरित राहतो. गोकुळमधील सत्तेची कोंडी सोडविण्यासाठी संपूर्ण सहकार क्षेत्राला लागू होणारी कायदेशीर व्यवस्था बदलणे कितपत योग्य आहे?

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील



विद्यमान तरतुदींनुसार तज्ज्ञ आणि कार्यलक्षी संचालकांच्या नियुक्तीची व्यवस्था आहे. मात्र, अशा संचालकांना मतदानाचा अधिकार नाही. यामागचा उद्देश स्पष्ट आहे. संस्थेच्या कामकाजात तज्ज्ञांचे ज्ञान आणि अनुभव उपयोगी पडावा; परंतु सभासदांनी निवडून दिलेल्या संचालक मंडळाच्या निर्णयप्रक्रियेवर त्यांचे नियंत्रण निर्माण होऊ नये. आता चार शासन नियुक्त संचालकांना मतदानाचा अधिकार मिळाल्यास सत्तेचे गणितच बदलू शकते. निवडून आलेल्या संचालकांचे बहुमत असूनही शासन नियुक्त सदस्यांच्या मतांमुळे निर्णयप्रक्रियेवर प्रभाव निर्माण होऊ शकतो.

याहून महत्त्वाचा मुद्दा म्हणजे संविधानाच्या ९७ व्या घटनादुरुस्तीने सहकारी संस्थांच्या स्वायत्ततेला दिलेले संरक्षण. संविधानातील अनुच्छेद २४३-झेडआयमध्ये संचालक मंडळावर स्वीकृत तज्ज्ञ सदस्यांची तरतूद करताना अशा सदस्यांना मतदानाचा अधिकार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यांची संख्या दोनपेक्षा अधिक असू नये, अशीही मर्यादा आहे. त्यामुळे राज्य सरकारच्या प्रस्तावित तरतुदींची घटनात्मक वैधता तपासली जाणे आवश्यक आहे. केवळ मंत्रिमंडळाची मान्यता मिळाली म्हणून कोणताही निर्णय घटनात्मक कसोटीवर टिकेलच असे नाही.

सहकारातील गैरव्यवहार, राजकीय हस्तक्षेप आणि आर्थिक अनियमितता रोखण्याची आवश्यकता निश्चितच आहे. मात्र, त्यासाठी पारदर्शक लेखापरीक्षण, सक्षम नियामक यंत्रणा, जबाबदारी निश्चित करणारी व्यवस्था आणि सभासदांचे अधिकार मजबूत करणे हा मार्ग असायला हवा. शासन नियुक्त संचालकांना मतदानाचा अधिकार देणे हा त्यावरचा उपाय होऊ शकत नाही. उलट, राजकीय सोयीसाठी अशा नियुक्त्यांचा वापर होण्याची शक्यता अधिक आहे.

आज गोकुळचा प्रश्न आहे, उद्या तो सहकारी साखर कारखान्यांचा, दूध संघांचा किंवा सूत गिरण्यांचा असेल. एखाद्या संस्थेतील निवडणुकीत अपेक्षित बहुमत मिळाले नाही म्हणून कायद्याच्या माध्यमातून सत्तेची समीकरणे बदलण्याचा पायंडा पडला, तर सहकारातील निवडणुकांना अर्थच उरणार नाही. सभासदांनी निवडून दिलेले संचालक केवळ नावापुरते राहतील आणि प्रत्यक्ष सत्तेची सूत्रे शासन नियुक्त सदस्यांच्या हातात जातील, अशी भीती निर्माण होणे स्वाभाविक आहे.

गोकुळ हे केवळ दूध संकलन आणि विक्री करणारे केंद्र नाही. ते लाखो दूध उत्पादकांच्या कष्टांचे, विश्वासाचे आणि आर्थिक स्वावलंबनाचे प्रतीक आहे. त्याचे राजकीय हस्तिनापूर होऊ देणे ही सहकार चळवळीची शोकांतिका ठरेल. मुख्यमंत्री फडणवीस यांना खरोखरच गोकुळच्या सत्तासंघर्षात हस्तक्षेप करायचा नसेल, तर त्यांनी सहकाराच्या स्वायत्ततेविषयीही तितकीच ठाम भूमिका घ्यायला हवी.

सहकारात दोष असतील तर ते दूर करा; पण दोषांच्या नावाखाली सहकाराचे स्वातंत्र्य हिरावून घेऊ नका. कारण सहकाराचा खरा मालक शासन नसून सभासद आहे. सभासदांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींना डावलून सत्तेची सूत्रे अप्रत्यक्षपणे शासनाच्या हाती जाणार असतील, तर सहकाराच्या मंदिरात लोकशाहीचा दिवा कसा तेवत राहणार? गोकुळचे गोकुळपण टिकवायचे की त्याचे हस्तिनापूर करायचे, याचा निर्णय आता राज्यकर्त्यांनी घ्यायचा आहे!

ऊस उत्पादकांचा एल्गार... ऊसाला ४५०० रुपये द्या... अन्यथा रस्ता रोखू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

माळवाडगाव : राज्यातील गाळप हंगाम २०२६-२७ सुरू होऊन जवळपास एक महिना उलटला असतानाही अहिल्यानगर जिल्ह्यातील बहुतांश साखर कारखान्यांनी अद्याप ऊसदर जाहीर केलेला नाही. दुष्काळी परिस्थितीमुळे ऊस उत्पादनात झालेली घट, साखरेचे बाजारातील दर आणि वाढता उत्पादन खर्च लक्षात घेता ऊस उत्पादक शेतकऱ्यांना पहिली उचल प्रतिटन ४५०० रुपये मिळावी, या प्रमुख मागणीसाठी राहुरी येथे सोमवार, दि. ९ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता बेमुदत रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अनिलराव औताडे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली.

राहुरी येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या गेटसमोर नगर-मनमाड महामार्गावर हे आंदोलन होणार आहे. या आंदोलनात शेतकरी संघटनेसह स्वाभिमानी शेतकरी संघटना, शिवसेना शिंदे गट, शरद जोशी विचार मंच, रयत क्रांती संघटना, प्रहार जनशक्ती संघटना आणि किसान श्रमिक जनशक्ती यांसह विविध संघटना सहभागी होणार असल्याचे सांगण्यात आले. अहिल्यानगर जिल्ह्यातील साखर कारखाने सुरू होऊन जवळपास एक महिना झाला असतानाही कर्मवीर काळे सहकारी साखर कारखाना वगळता इतर कारखान्यांनी अद्याप ऊसदर जाहीर केलेला नाही. कर्मवीर काळे कारखान्याने प्रतिटन ३२०० रुपये दर जाहीर केल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी असल्याचे औताडे यांनी म्हटले आहे. इतर कारखाने एफआरपीनुसार प्रतिटन २७०० ते ३०५० रुपये दर देण्याच्या तयारीत असल्याचा दावाही त्यांनी केला.

साखरेची किमान विक्री किंमत (एमएसपी) प्रतिकिलो ३० रुपये असली, तरी बाजारात साखरेचे दर प्रतिकिलो ४८ ते ५५ रुपयांपर्यंत राहिले आहेत. अशा परिस्थितीत केवळ एमएसपीचा आधार घेऊन ऊसदर निश्चित करणे योग्य नसून बाजारातील साखरेचे दर विचारात घेऊन शेतकऱ्यांना योग्य मोबदला द्यावा, अशी मागणी शेतकरी संघटनेने केली आहे. एक टन उसापासून सुमारे १२५ किलो साखर तयार होते. याशिवाय इथेनॉल, कोजनरेशन, मळी आणि बगॅस यांसारख्या उपपदार्थांतूनही कारखान्यांना उत्पन्न मिळते.

त्यामुळे ऊस उत्पादकांना त्यांच्या घामाचा योग्य मोबदला मिळावा, अशी भूमिका संघटनेने मांडली आहे. इतर ऊस उत्पादक राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील, विशेषतः अहिल्यानगर जिल्ह्यातील ऊसदर कमी असल्याचा दावा करत शेतकरी संघटनांनी यापूर्वीही विविध आंदोलने केली आहेत. मात्र, शेतकऱ्यांना अपेक्षित दर मिळत नसल्याने यंदा व्यापक आंदोलन उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ऊसदराचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी जिल्ह्यातील विखे आणि थोरात या प्रमुख नेत्यांनी पुढाकार घेऊन ऊस उत्पादक शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी अपेक्षाही औताडे यांनी व्यक्त केली आहे. तसेच साखरेची एमएसपी वाढविण्यासाठी साखर कारखानदार आणि राज्य सरकारने केंद्र सरकारकडे एकत्रितपणे पाठपुरावा करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हक्काच्या दरासाठी आणि साखर कारखाने तसेच शासनाचे लक्ष वेधण्यासाठी होणाऱ्या या बेमुदत रास्ता रोको आंदोलनात जिल्ह्यातील हजारो ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अनिलराव औताडे, शिवसेना शिंदे गटाचे रवींद्र मोरे, दिलीपराव इंगळे, युवराज जगताप, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे बाळासाहेब फटांगडे, रावसाहेब लवांडे, प्रहारचे ॲड. पांडुरंग औताडे, शरद जोशी विचार मंचचे निलेश शेडगे, किसान श्रमिक जनशक्तीचे नरेंद्र काळे, जिल्हा संपर्कप्रमुख शिवाजी जवरे, जिल्हा युवा आघाडीचे बच्चू मोडवे, नारायण टेकाळे, हरिभाऊ तुवर, अशोक काळे, शेतकरी संघटनेचे माजी जिल्हाध्यक्ष विठ्ठलराव शेळके, भास्कर तुवर आदी शेतकरी नेत्यांनी केले आहे.

बुधवारी रंगणार दिवाळी पहाट गाण्यांची मैफिल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

संगमनेर : शहराच्या सांस्कृतिक वैभवात भर घालणारा दिवाळी पहाट गाणी हा कार्यक्रम बुधवारी भाऊबीजेच्या दिवशी सकाळी सहा वाजता भंडारी मंगल कार्यालयात होणार आहे या कार्यक्रमाला संगमनेरकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन एकविरा फाउंडेशनच्या वतीने जयश्रीताई थोरात यांनी केले आहे.

येथील ज्येष्ठ साहित्यिक आणि संगमनेर इतिहास संशोधन मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. संतोष खेडलेकर यांची संकल्पना आणि निवेदन असलेल्या या कार्यक्रमात यावर्षी भंडारदरा धरणाला शंभर वर्षे पूर्ण झाल्याबद्दल सांगितिक कृतज्ञता व्यक्त करण्यात येणार आहे अशी माहिती या कार्यक्रमाच्या निमंत्रक उत्कर्षा रुपवते यांनी दिली आहे. भंडारदरा धरणावर मागील सात आठ दशकात असंख्य चित्रपट गीतांचे चित्रीकरण झाले आहे. यातील निवडक गाणी सादर केली जाणार आहेत. याचंबरोबर मागील वर्षभरात दिवंगत झालेल्या गायिका आशा भोसले, सुमन कल्याणपूर यांनी गायलेली तसेच अभिनेत्री मधू कांबिकर, अभिनेते नाना पाटेकर यांच्यावर चित्रित झालेली गाणीही कार्यक्रमात सादर केली जाणार आहेत.

सत्यजित सराफ यांचे संगीत संयोजन असलेल्या या कार्यक्रमात इंडियन आयडॉल फेम गायिका सुरभी कुलकर्णी, विकास भालेराव, अजित गुंदेचा, श्रीकांत गडकरी, दिलावर शेख, वैभव पवार आदी सहभागी होणार आहेत.

बुधवारी सकाळी सहा वाजता होणाऱ्या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन नगराध्यक्ष मैथिली तांबे, धनश्री सोमाणी, अमृतवाहिनी बँकेचे चेअरमन सुधाकर जोशी, अरविंद रसाळ, डरकानाथ राठी तसेच कार्यक्रमाचे प्रकल्प प्रमुख देवीदास गोरे आणि अभिजित खेडलेकर यांनी केले आहे.

कारखान्यांची चाके फिरली; ऊसदराची कोंडी कायम

दीड महिना गाळप सुरू, तरी दर जाहीर नाही

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

सोनगाव : शेतकऱ्यांच्या शेतातील ऊस कारखान्यांत जात आहे; मात्र त्या उसाचा दर किती मिळणार, हेच शेतकऱ्यांना माहीत नाही! गाळप हंगाम सुरू होऊन दीड महिना उलटला, तरी अहिल्यानगर जिल्ह्यातील कारखानदारांनी ऊसदराची कोंडी फोडलेली नाही. वारंवार आंदोलने करूनही आश्वासनांपलीकडे काहीच घडत नसल्याने शेतकरी संतप्त झाले आहेत. अखेर ९ नोव्हेंबरपासून नगर-मनमाड महामार्गावर बेमुदत रास्तारोको आंदोलनाचा इशारा शेतकरी संघटनेचे रवींद्र मोरे यांनी दिला.

यापूर्वी ऊस वाहतूक रोखून आंदोलन करण्यात आले होते. त्यावेळी कारखानदार, शेतकरी संघटना आणि शेतकऱ्यांची संयुक्त बैठक घेऊन तोडगा काढण्याचे आश्वासन देण्यात आले. मात्र, ५ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीला भानुदास मुरकुटे यांचा अपवाद वगळता एकाही कारखान्याचे चेअरमन उपस्थित राहिले नाहीत. पालकमंत्र्यांचे निर्देश असतानाही कारखानदारांनी बैठकीकडे



पाठ फिरविल्याने शेतकरी संघटनेने नाराजी व्यक्त केली.

सध्या साखरेचे टेंडर ५० ते ५५ रुपये किलोने होत असून किरकोळ बाजारात ६० रुपये दर आहे. मागील वर्षी साखरेचा दर३७ ते ३८ रुपये असताना उसाला ३१०० ते ३२०० रुपये प्रतिटन भाव मिळाला. मग यंदा ४००० ते ४५०० रुपये प्रतिटन दर का मिळू नये, असा सवाल मोरे यांनी केला. लवकर गाळप सुरू झाल्याने एकरी चार ते पाच टन उत्पादनाचा फटका बसत असल्याचेही त्यांनी सांगितले. राज्य सरकारने प्रतिटन एक हजार रुपये अनुदान द्यावे, अशी मागणीही त्यांनी केली.

९ नोव्हेंबरपासून नगर-मनमाड महामार्गावर बेमुदत रास्तारोको करण्यात येणार असून धानोरे, सोनगाव, सात्रळ परिसरातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले.

यावेळी अवधूत चोरमुंगे, रवींद्र मोरे, बापूसाहेब दिघे, अमोल दिघे, अण्णासाहेब कडू, भास्कर दिघे, पोपटराव कडू, दिलीप इंगळे, नरेंद्र कडू, अरुण जोंधळे, किरण कडू, अनिल इंगळे, पंकज दिघे, संजय दिघे, आदिनाथ दिघे, सोमनाथ दिघे तसेच ग्रामस्थ आदी उपस्थित होते.

दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या शेतकरी कुटुंबासोबत पालकमंत्री विखे पाटीलांची दिवाळी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पाथर्डी : दुष्काळाच्या संकटामुळे शेतकरी कुटुंबांच्या घरातील दिवाळीचा आनंद काहीसा हिरावला गेला आहे. शेतातील उभ्या पिकांची चिंता, पाण्याची टंचाई, जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न आणि आर्थिक विवंचना अशा अनेक संकटांचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री तथा जलसंपदामंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी भिवसेन शंकर भवार या शेतकऱ्याच्या घरी दिवाळीचा सण साजरा करून पिठल भाकरीच जेवण केले.संकटाच्या प्रसंगी सरकार तुमच्या पाठीशी असल्याचा विश्वास देण्यासाठी आलो असल्याची भावना त्यांनी बोलून दाखवली.

मंत्री विखे पाटील यांनी कळसपिंपरी येथील ग्रामस्थांशी संवाद साधून त्यांचे प्रश्न समाजावून घेतले.लहान मुलांना मिठाई आणि फटक्याचे वाटप केले. उपस्थित महीला युवक यांची आस्थेने चौकशी करून त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाबाबत अधिकार्यांना सूचना केल्या. आ.मोनिका राजळे यांच्यासह सर्व विभागांचे अधिकारी उपस्थित होते.गावातील भवार कुटुंबियांच्या घरी मंत्री विखे पाटील यांनी पणती पेटवून दिवाळी सणाचा आनंद द्विगुणीत केला. पारंपारीक पध्दतीने मंत्री विखे पाटील यांचे औक्षण केले.सोबत आणलेले कपडे मिठाई त्यांनी लाडक्या बहीणीला दिली.मुलांच्या शिक्षणा बरोबरच शेती व्यवस्यायाची माहीती जाणून घेतली.भवार कुटूंबियांनी केलेल्या पिठल भाकरीच जेवण मंत्री विखे पाटील यांनी सर्व सोपस्कार बाजूला ठेवत जमीनीवर बसून घेतले.



दुष्काळाची दाहकता लक्षात घेवून राज्यातील महायुती सरकारने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली शेतकर्यांना पाच हजार रूपयांची अग्रीम मदत बॅक खात्यात वर्ग केली.यापुर्वी कर्जमाफीचा ऐतिहसिक निर्णय घेतला.अनेक वर्ष थकलेले वीजबील माफ केल्याची माहीती देवून हे सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे.मुख्यमंत्र्यासह सरकार मधील आम्ही सर्व मंत्री या संकटात तुमच्या समवेत आहोत हा विश्वास देण्यासाठी आलो असल्याचे मंत्री विखे पाटील म्हणाले. गावातील पाणी समस्येबाबत त्यांनी ग्रामस्थांसमोरच जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकार्यांना दूरध्वनी वरून सूचना देवून पाणी योजनेवर फिल्टर प्लॅन्ट बसविण्याच्या सूचना दिल्या.चारा उत्पादना बाबत प्रशासकीय स्तरावर सर्व नियोजन झाले असून शासन शेतकऱ्यांच्या मदतीत कुठेही कमी पडणार नसल्याची हमी मंत्री विखे पाटील यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

संत सावता सोसायटीकडून सभासदांना व पत्रकारांना दिवाळीनिमित्त साखर वाटप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

टाकळीभान : श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथील श्री संत सावता माळी सोसायटीच्यावतीने सालाबादप्रमाणे दिवाळीनिमित्ताने सभासदांना प्रत्येकी १० किलो साखरेचे वाटप करण्यात आले.

सभासदांची दिवाळी गोड व्हावी या उद्देशाने श्री संत सावता माळी सेवा संस्थेच्या वतीने शुक्रवार दि.६ रोजी सकाळी ९ वा. संचालक मंडळ व सभासद पत्रकारांच्या उपस्थितीत सभासदांना प्रत्येकी १० किलो साखरेचे वाटप करून आनंद द्विगुणीत करण्यात आला. यावेळी अशोकचे माजी अध्यक्ष ज्ञानदेव साळूंके, कारेगाव भाग संचालक शिवाजी शिंदे, राष्ट्रवादी किसान सभेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र कोकणे, बाजार समिती संचालक मयूर पटारे, संत सावताचे संचालक विलास दाभाडे, माजी उपसरपंच भारत भवार, संचालक दत्तात्रय नाईक, गोटीराम दाभाडे, माजी उपाध्यक्ष प्रकाश दाभाडे, सामाजिक कार्यकर्ते बापूसाहेब शिंदे, बाबासाहेब तनपुरे, माजी सरपंच भाऊसाहेब मगर, गजानन कोकणे, विठ्ठल लाड, श्रीधर गाडे, प्रल्हाद कापसे, गोरख खुरूद, शिवाजी पटारे, इंद्रभान दाभाडे, किशोर दाभाडे आदी उपस्थित होते.



बाबाजींचे कार्य केवळ त्यांचे नाही, तर आपल्या सर्वांची ती जबाबदारी

गुरुभक्ती, आध्यात्मिक संस्कार आणि राष्ट्रनिर्मितीचा संकल्प प्रत्येकाने जोपासावा



आपण सर्वजण मोठ्या श्रद्धेने म्हणतो की, 'बाबाजी करतील, बाबाजी हे देव आहेत.' मात्र, एक गोष्ट आपण लक्षात घेतली पाहिजे की, बाबाजींना त्यांच्या भक्तांकडूनही काहीतरी करून घ्यायचे आहे. आपण जे काही कार्य करतो, ते केवळ आपण करत नसतो, तर आपल्या बाबाजींची प्रेरणा आणि आशीर्वाद आपल्याकडून ते कार्य करून घेत असतात, अशी आपली श्रद्धा आहे. पूर्वी यज्ञ-अनुष्ठाने ऋषी-मुनी करत असत. मात्र, आज आपल्या बाबाजींनी सामान्य माणसालाही यज्ञ-अनुष्ठान करण्याची संधी दिली आहे. ही बाब आपण कमी समजू नये. आपल्या मुलांवर चांगले संस्कार व्हावेत, त्यांच्यात आध्यात्मिक विचार रुजावेत, असे वाटत असेल तर प्रत्येक पालकाने आपल्या मुलांसाठी दरवर्षी किमान एक अनुष्ठान करण्याचा संकल्प केला पाहिजे. कारण शालेय शिक्षणातून पुस्तकी ज्ञान मिळते; मात्र आध्यात्मिक ज्ञान आणि जीवनमूल्यांचे संस्कार गुरुमाऊलीच्या सान्निध्यातून मिळतात.

आजच्या काळात विज्ञानाइतकीच आध्यात्माचीही गरज आहे. विज्ञान माणसाला प्रगतीचा मार्ग दाखवते, तर अध्यात्म त्याला योग्य दिशा आणि विवेक देते. विज्ञान आणि अध्यात्म यांचा समतोल साधला, तरच सुसंस्कृत समाज आणि समर्थ राष्ट्र निर्माण होऊ शकते. आपले बाबाजी हे सर्व कार्य का करत आहेत, याचा आपण कधी विचार केला आहे का? देव, देश आणि धर्मासाठी बाबाजी जी धडपड करत आहेत, त्यामागे समाजाला आध्यात्मिकदृष्ट्या सक्षम आणि सुसंस्कृत बनविण्याचा त्यांचा उद्देश आहे. त्यामुळे जय बाबाजी भक्त परिवारातील प्रत्येकाने बाबाजींना एकच सांगितले पाहिजे की, 'बाबाजी, ही लढाई केवळ तुमची नाही, तर आमच्या सर्वांची आहे. या कार्यात आम्हीही तुमच्या खांद्याला खांदा लावून उभे राहू.' आज काही महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना बाबाजींच्या शिकवणुकीशी संबंधित हातावरील चिन्ह किंवा खूण काढून टाकण्यास सांगितले जाते, असे माझ्या निदर्शनास आले आहे. काही ठिकाणी ते काढल्यानंतरच विद्यार्थ्यांना वर्गात प्रवेश दिला जातो. अशा वेळी संबंधित शिक्षकांना माझे नम्रपणे सांगणे आहे की, शिक्षणाला आम्ही नक्कीच महत्त्व देतो; मात्र आमची गुरुभक्ती आणि श्रद्धा पुसून टाकण्याचा आग्रह धरू नये. शिक्षण आणि अध्यात्म हे एकमेकांच्या विरोधात नाहीत. विद्यार्थ्यांनी शिक्षणही घ्यावे आणि आपल्या संस्कारांशी असलेली नाळही जपावी.

मुलांनो, भरपूर शिका, मोठे व्हा, आयुष्यात यशस्वी व्हा; पण आपल्या आई-वडिलांना आणि गुरुमाऊलीला कधीही विसरू नका. आपण आज जे काही आहोत, त्यामागे आई-वडिलांचे कष्ट आणि गुरुमाऊलीचे मार्गदर्शन आहे, अशी आपली भावना असली पाहिजे. जसा कुंभार मातीच्या गोळ्याला आकार देऊन सुंदर मडके घडवतो, त्याचप्रमाणे आपल्या बाबाजींनी आपल्या जीवनाला योग्य आकार दिला आहे. त्यामुळे आयुष्यात असे काहीतरी बनावे की, आपल्या हातून आई-वडिलांची आणि गुरूंची सेवा घडेल. आपण सर्वजण बाबाजींची लेकरे आहोत. त्यामुळे आपल्या आईसाठी, आपल्या गुरुमाऊलीसाठी आणि त्यांच्या कार्यासाठी प्रत्येकाने एक पाऊल पुढे टाकले पाहिजे. केवळ जयघोष करून चालणार नाही, तर त्यांच्या विचारांचे आचरण आपल्या जीवनात उतरवले पाहिजे. समाजात चांगले विचार रुजवणे, मुलांवर संस्कार करणे आणि देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी योगदान देणे, हीच खरी गुरुभक्ती ठरेल. शेवटी एकच सांगावेसे वाटते की, कष्टाला पर्याय नाही आणि मेहनतीला शॉर्टकट नाही. जो दररोज घाम गाळतो, त्याच्या यशाचा मार्ग कोणीही रोखू शकत नाही. छन्नीचे घाव सोसल्याशिवाय दगडालाही देवपण प्राप्त होत नाही आणि संघर्ष केल्याशिवाय कोणाचेही नशीब बदलत नाही. चला, आपण सर्वजण एकत्र येऊया. बाबाजींचे विचार आत्मसात करूया, आध्यात्मिक संस्कारांची परंपरा पुढील पिढीपर्यंत पोहोचवूया आणि देव, देश व धर्माच्या कार्यात आपले योगदान देऊया. जय बाबाजी ! जय महात्माजी!



शब्दांकन : प्रिया जवाहरलाल कुऱ्हे
(लोणारी)
रा : पिंपळखुटे
ता : येवला जि : नाशिक

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26)

ऊसदराचा तिढा सुटताच पुणतांब्यात शेतकऱ्यांचा जल्लोष

राजू शेट्टी यांच्या आंदोलनाला यश;पहिली उचल विनाकपात ३ हजार ९०० रुपये

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

पुणतांबा : ऊसदराच्या प्रश्नावर शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी आणि साखर कारखानदार यांच्यात चर्चा होऊन समाधानकारक तोडगा निघाल्याने शेतकरी संपाचे गाव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुणतांब्यात शेतकऱ्यांनी जल्लोष केला. एकमेकांना पेढे भरवून आणि घोषणाबाजी करून शेतकऱ्यांनी या निर्णयाचे स्वागत केले.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार गटाचे) जिल्हा सरचिटणीस बाळासाहेब चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या संख्येने शेतकरी ग्रामपंचायतीसमोरील बळीराजाच्या पुतळ्याजवळ एकत्र आले. यावेळी 'शेतकऱ्यांचा विजय असो', 'कोण म्हणते देणार नाही, घेतल्याशिवाय राहणार नाही' अशा घोषणा देत परिसर दणाणून सोडला.

ऊसाला योग्य भाव मिळावा, यासाठी राजू शेट्टी यांनी पुणे-बंगळुरू महामार्गावरील किणी टोलनाक्यावर तब्बल ६१ तास चक्काजाम आंदोलन केले. तीन दिवसांच्या आंदोलनानंतर ऊसदराच्या प्रश्नावर तोडगा निघाला. शेतकऱ्यांना पहिली उचल विनाकपात प्रतिटन ३ हजार ९०० रुपये आणि त्यानंतर अतिरिक्त २०० रुपये देण्याचे साखर कारखानदारांनी मान्य केले. त्यामुळे शेतकरी संघटनेने आंदोलन मागे घेतले.

दुष्काळी परिस्थितीत ऊस उत्पादक शेतकऱ्यांना समाधानकारक दर मिळाल्याने पुणतांबा परिसरासह अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतकरी वर्गात



आनंदाचे वातावरण आहे. राजू शेट्टी यांच्या आंदोलनामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांची दिवाळी गोड झाल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

अहिल्यानगर जिल्ह्यातील साखर कारखानदारांनीही पहिली उचल विनाकपात प्रतिटन ३ हजार ९०० रुपये द्यावी, असा विश्वास बाळासाहेब चव्हाण यांच्यासह उपस्थित शेतकऱ्यांनी व्यक्त केला.

यावेळी भाऊसाहेब जेजूरकर, मच्छिंद्र धनवटे, गोकुळ बोर्डे, बाळासाहेब वहाडणे, एकनाथ धनवटे, अशोक कुलकर्णी, काजीबाबा, दत्तात्रय फलके यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

द•ख•ल



कोकमठाण येथे गोरगरीबांना दिवाळी शिध्याचे वाटप

पोहेगांव : दिवाळी हा आनंदाचा आणि उत्साहाचा सण प्रत्येकाच्या घरात गोडवा निर्माण करणारा असतो. मात्र, यंदा दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी, शेतमजूर आणि गोरगरीब कुटुंबांसमोर आर्थिक अडचणी निर्माण झाल्या आहेत. अशा परिस्थितीत या कुटुंबांची दिवाळी गोड व्हावी, या उद्देशाने महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख एकनाथराव शिंदे यांच्या संकल्पनेतून कोकमठाण येथे गरजू नागरिकांना दिवाळी शिध्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमांतर्गत दुष्काळी परिस्थितीचा सामना करणाऱ्या शेतकरी, शेतमजूर व गरजू कुटुंबांना दिवाळीनिमित्त शिधा देण्यात आला. सणासुदीच्या काळात गरजू कुटुंबांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याचा या उपक्रमातून प्रयत्न करण्यात आला. यावेळी शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खा. भाऊसाहेब वाकचौरे, शिवसेना जिल्हाप्रमुख नितीनराव औताडे, उपजिल्हाप्रमुख देवाभाऊ लोखंडे, दिगंबर पवार, राहुल दहिवाळ, अमोल फटांगरे, कैलास वाघ, वसंत त्रिभुवन, शफिक शहा, साजिद मणियार, सचिन लोखंडे, भरत कंकराळ, सोमनाथ पवार यांच्यासह शिवसैनिक व महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

कृषितरंग पुस्तकातून शेतकऱ्याच्या व्यथांना वाचा फोडण्याचे काम : दिनकर ताके



नेवासा : कृषितरंग पुस्तकातून शेतकऱ्याच्या व्यथांना वाचा फोडण्याचे मोठे काम डॉ.अशोकराव ढगे यांनी केले असल्याचे गौरवोद्गार भाजपचे जेष्ठ नेते दिनकरराव ताके यांनी काढले. कृषी शास्त्रज्ञ डॉ. अशोक ढगे लिखित कृषितरंग पुस्तक भाजपचे ज्येष्ठ नेते दिनकरराव ताके यांना भेट देण्यात आले. यावेळी ताके बोलत होते. यावेळी नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले, गोविंद साळुंके, निर्मलाताई ढगे, अशोक ताके, भाजपचे युवा नेते अनिल ताके आदी उपस्थित होते. यावेळी भाजपचे जेष्ठ नेते दिनकरराव ताके यांचा शेतकऱ्यांसाठी जीवनात दिलेल्या लढ्याबद्दल डॉ. अशोकराव ढगे व डॉ.करणसिंह घुले यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी विविध विषयांवर विधायक चर्चा झाली. नेवासा तालुक्यातील विविध प्रलंबित प्रश्नांचा यावेळी ऊहापोह झाला.

शेतातील मोटार चोरणारे दोघे जेरबंद

८० हजारांच्या दोन मोटारींसह दोन दुचाकी हस्तगत



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नेवासा : पोलीस स्टेशनच्या हद्दीतील रांजणगाव शिवारात शेतातील विहीर व बोअरवेलवर बसविण्यात आलेल्या इलेक्ट्रिक पाणी मोटारी चोरी करणाऱ्या दोन आरोपींना नेवासा पोलिसांनी जेरबंद केले आहे. आरोपींकडून सुमारे ८० हजार रुपये किमतीच्या दोन इलेक्ट्रिक पाणी मोटारी तसेच चोरीच्या गुन्ह्यात वापरण्यात आलेल्या दोन दुचाकी हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे. रांजणगाव शिवारातील शेतातील विहीर व बोअरवेलवर बसविण्यात आलेली इलेक्ट्रिक पाण्याची मोटार अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना घडली होती.

याप्रकरणी नेवासा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा रजिस्टर क्रमांक ८८२/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास करताना पोलिसांनी संशयित शुभम सुनील बर्डे व ऋषिकेश जगदीश ठाकर (दोघेही रा. रांजणगाव, ता. नेवासा) यांच्याकडे कसून चौकशी केली.

चौकशीदरम्यान त्यांनी गुन्ह्याची कबुली दिल्यानंतर त्यांच्याकडून ८० हजार रुपये किमतीच्या दोन इलेक्ट्रिक पाणी मोटारी तसेच गुन्ह्यात वापरण्यात आलेल्या टीव्हीएस कंपनीची मोटारसायकल व बजाज पल्सर अशा दोन दुचाकी हस्तगत करण्यात आल्या.

दिवाळीची खरेदी स्थानिक व्यापाऱ्यांकडूनच करा : आ. खताळ

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

संगमनेर : दिवाळी हा आनंद, उत्साह आणि समृद्धीचा सण आहे. या सणाच्या निमित्ताने नागरिकांनी आपल्या परिसरातील स्थानिक व्यापाऱ्यां



कडून, विशेषतः हिंदुत्ववादी विचार सरणी जपणाऱ्या व्यापाऱ्यांकडून वस्तूंची खरेदी करावी. आवाहन आ. अमोल खताळ पाटील यांनी केले.

दिवाळी सणानिमित्त नागरिकांना शुभेच्छा देताना आमदार खताळ म्हणाले की, दिवाळीच्या काळात बाजारपेठेत मोठ्या प्रमाणावर खरेदी-विक्री होत असते. कपडे, किराणा, मिठाई, सजावटीच्या वस्तू, विद्युत रोषणाई तसेच इतर जीवनावश्यक वस्तूंच्या खरेदीसाठी नागरिक बाजार पेठेत गर्दी करतात. या काळात ग्राहकांनी मोठ्या दुकानांबरोबरच आपल्या परिसरातील छोट्या-मोठ्या स्थानिक व्यापाऱ्यांचाही विचार करणे आवश्यक आहे. ग्राहकांनी स्थानिक व्यापाऱ्यांकडून खरेदी केल्यास त्यांच्या व्यवसायाला चालना मिळते. तसेच स्थानिक बाजारपेठेतील आर्थिक उलाढाल वाढून त्याचा फायदा परिसरातील अनेक घटकांना होतो.

या वर्षी पावसाचे प्रमाण कमी राहिले त्यामुळे दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्याचा परिणाम शेती आणि शेतमालाच्या बाजारपेठे वर झाला असून त्याचा अप्रत्यक्ष फटका स्थानिक व्यापाऱ्यांनाही बसत आहे. अशा परिस्थितीत सणासुदीच्या काळात स्थानिक व्यापाऱ्यांच्या व्यवसायाला उभारी देण्यासाठी नागरिकांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे.आपल्या परिसरातील व्यापाऱ्यां कडून खरेदी केल्यास पैसा स्थानिक बाजारपेठेतच राहतो आणि त्यातून स्थानिक अर्थव्यवस्थेला बळ मिळते.

दुष्काळाच्या झळांमध्ये दूध उत्पादक शेतकऱ्यांची दिवाळी गोड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

प्रवरानगर : एकीकडे दुष्काळाच्या झळा, शेतीतील आर्थिक संकट आणि वाढता उत्पादन खर्च यामुळे शेतकरी अडचणीत असताना पिंपरी निर्मळ येथील दूध उत्पादक शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी समोर आली आहे. जय बजरंग बली दूध संकलन केंद्राच्या माध्यमातून दूध उत्पादक शेतकऱ्यांना तब्बल ५२ लाख रुपयांचे वाटप करण्यात आले असून, यामुळे अनेक शेतकऱ्यांची दिवाळी खऱ्या अर्थाने गोड झाली आहे.

दूध संकलन केंद्राचे सर्वे सर्वा तथा माजी चेअरमन, वि. स. सोसायटी पिंपरी निर्मळचे डॉ. विकास बाळकृष्ण निर्मळ यांच्या पुढाकारातून हे वाटप करण्यात आले.



यामध्ये शेतकऱ्यांना ३४ लाख रुपये अनामत व रिबेटपोटी, तर १८ लाख रुपये दूध व्यवसायाचे पेमेंट अशा एकूण ५२ लाख रुपयांची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आली. याशिवाय दूध उत्पादक शेतकऱ्यांना दिवाळीनिमित्त गोड मिठाईचेही वाटप करण्यात आले.

डॉ. विकास निर्मळ यांची ओळख केवळ दूध संकलन केंद्राचे नेतृत्व करणारे व्यक्तिमत्त्व एवढीच नसून, शेतकऱ्यांच्या सुख-दुःखात धावून जाणारा आणि त्यांच्या अडीअडचणीच्या काळात खंबीरपणे पाठीशी उभा राहणारा माणूस अशी आहे. दूध उत्पादकांना उत्कृष्ट भाव मिळवून देणे, त्यांच्या आर्थिक अडचणी समजून घेणे आणि गरजेच्या वेळी मदतीचा हात पुढे करणे, ही त्यांची कार्यपद्धती राहिली आहे. 'शेतकरी जगला तरच गाव जगेल आणि दूध उत्पादक सक्षम झाला तरच ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट होईल,' या भावनेतून त्यांचे कार्य सुरू असल्याचे ग्रामस्थांकडून बोलले जात आहे.

बेलापूर सोसायटीचा १५ टक्के लाभांश १० किलो साखर, कामगारांना बोनस

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



बेलापूर : बेलापूर बुद्रुक विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या वतीने दिवाळीनिमित्त सभासदांना १५ टक्के लाभांश आणि प्रत्येकी १० किलो साखरेचे वाटप करण्यात आले. संस्थेच्या कामगारांना दोन महिन्यांच्या पगाराएवढा बोनस देण्यात आला. बेलापूर विविध कार्यकारी सहकारी सोसायटीचे चेअरमन अरुण पाटील नाही आणि श्रीरामपूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुधीर नवले यांच्या दूरदृष्टीतून शेतकरी सभासदांची आणि कामगारांची देखील दिवाळी गोड झाली आहे.

कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुधीर नवले संस्थेचे विद्यमान चेअरमन अरुण पाटील नाईक, कर्मयोगी मुरलीधर खटोड पतसंस्थेचे चेअरमन तथा जनता आघाडीचे नेते रवींद्र खटोड, माजी सरपंच भारत साळुंके, माजी उपसभापती दत्ता कुऱ्हे, ऐनतपूर सोसायटीचे चेअरमन चंद्रकांत नाईक आणि मार्केट कमिटीचे माजी सचिव साहेबराव वाबळे उपस्थित होते.

संस्थेचे चेअरमन अरुण नाईक म्हणाले, बेलापूर बुद्रुक सोसायटी गेल्या १५ वर्षांपासून सभापती सुधीर नवले, जनता आघाडीचे नेते रवींद्र खटोड आणि आपल्या नेतृत्वाखालील शेतकरी विकास मंडळाच्या ताब्यात आहे. आजपर्यंतच्या सर्व चेअरमन, व्हाईस चेअरमन आणि संचालकांनी शेतकरी सभासदांना केंद्रबिंदू मानून संस्थेचा कारभार पारदर्शक व काटकसरीने केला आहे. त्यामुळेच सभासदांनी संस्थेवर विश्वास व्यक्त केला आहे.

शेतकरी सभासद हाच संस्थेचा खरा मालक असून त्यांचे हित जपणारे निर्णय घेणे आणि संस्थेची प्रगती साधणे ही आमची जबाबदारी आहे. सभासदांनी दाखविलेल्या विश्वासाला कधीही तडा जाऊ दिला जाणार नाही, अशी ग्वाही अरुण पाटील नाईक यांनी दिली.

सध्याच्या दुष्काळी परिस्थितीत शेतकरी सभासदांची दिवाळी गोड व्हावी, या उद्देशाने यंदा १५ टक्के लाभांश आणि प्रत्येकी १० किलो साखर देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच कामगार वर्गाच्या योगदानाची दखल घेऊन त्यांनाही दोन महिन्यांच्या पगाराएवढा बोनस देण्यात आला आहे. सातत्याने सभासदांना लाभांश, भेटवस्तू आणि साखरेचे वाटप करणारी बेलापूर सोसायटी ही श्रीरामपूर तालुक्यातील एकमेव संस्था असल्याचेही त्यांनी नमूद केले. याप्रसंगी सभापती सुधीर नवले, रवींद्र खटोड आणि दत्ता कुऱ्हे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे स्वागत व आभार विशाल मेहेत्रे यांनी मानले.

यावेळी शेषराव पवार, राजेंद्र सातभाई, शिवाजी पाटील वाबळे, किशोर नवले, पंडितराव बोंबले, विश्वनाथ गवते, अशोक कुऱ्हे, अंतोन अमोलिक, तुकाराम मेहेत्रे, सुधाकर खंडागळे, काशिनाथ गाढे, भास्कर वाबळे, ज्ञानदेव वाबळे, अनिल नाईक, प्रकाश पाटील नाईक, भास्कर बंगाल, भरत सोमानी, प्रकाश कुऱ्हे, मारुती राशिनकर, भाऊसाहेब कुताळ, भाऊसाहेब वाबळे यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी सभासद उपस्थित होते. दरम्यान बेलापूर विविध कार्यकारी सहकारी सोसायटीचे शेकडो सभासद शेतकरी कामगार अशा सर्वांनी संस्थेच्या सर्व सभासदांवर अभिनंदनचा वर्षाव केला आहे.

वैद्यकीय सेवेसह सामाजिक योगदानाबद्दल डॉ. करणसिंह घुले यांचा गौरव



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

नेवासा : वैद्यकीय व्यवसाय सांभाळतानाच सामाजिक व धार्मिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणारे नेवासा शहराचे आद्य नागरिक तथा नगरपंचायतचे नगराध्यक्ष डॉ. करणसिंह घुले पाटील यांचा त्यांच्या पत्नी डॉ.वैशाली घुले पाटील यांच्या समवेत नेवासा मेडिकल असोसिएशनच्या वतीने सन्मानचिन्ह प्रदान करून गौरव करण्यात आला.

डॉ. करणसिंह घुले पाटील यांनी नेवासा मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष म्हणून कार्यभार सांभाळताना संघटनेच्या माध्यमातून वैद्यकीय क्षेत्रातील विविध उपक्रमांना चालना देत उत्कृष्ट कार्य केले आहे. वैद्यकीय सेवेबरोबरच सामाजिक बांधिलकी जपत धार्मिक व सामाजिक कार्यातही त्यांनी आपले योगदान दिले आहे.

नगराध्यक्ष डॉ.करणसिंह घुले पाटील यांच्या झालेल्या सन्मान सोहळ्याच्या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.विष्णू देवरे,जेष्ठ मार्गदर्शक डॉ.भाऊसाहेब घुले,डॉ.राजेंद्र शिर्के, मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. किशोर गळनिंबकर,स्त्रीरोग तज्ञ व नगरसेविका डॉ.मनिषा वाघ,उपाध्यक्ष डॉ. निर्मला सांगळे,डॉ.गणेश नांदे,असोसिएशनचे खजिनदार डॉ.संदीप देशमुख,सक्रिय टीम सदस्य डॉ.वरुण देवरे यांच्यासह नेवासा मेडिकल असोसिएशनचे सर्व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

टाकळीभान उपबाजार आवारात लाल कांद्याची आवक सुरु

पहिल्याच दिवशी कांद्याला ४,०११ रुपये प्रतिक्विंटलचा भाव

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

टाकळीभान : कृषी उत्पन्न बाजार समितीच्या टाकळीभान उपबाजार आवारात आज नवीन लाल कांद्याची आवक सुरू झाली. यानिमित्त लाल कांदा विक्रीचा शुभारंभ प्रगतशील शेतकरी शिवातात्या पटारे आणि व्यापारी राजू शेंडे यांच्या शुभहस्ते नारळ फोडून करण्यात आला.

नवीन लाल कांद्याच्या पहिल्याच दिवशी ४,०११ रुपये प्रतिक्विंटल असा उच्चांकी भाव मिळाला. त्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.



यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक मयूर पटारे, संत सावता संस्थेचे संचालक विलास दाभाडे, व्यापारी सुभाष ब्राह्मणे, संदीप बनकर, दादाराम आघम, सचिन दहे, सीताराम जगताप, ललित कोठारी आदी उपस्थित होते.

जाहीर नोटीस

निशाणी - १६९

राहुरी येथिल मे. सिव्हील जज्जसाहेब सिनिअर डिव्हीजन यांचे कोर्टात ....

रे.मु.नं. ४५१/२००७ — ॲड. एम. डी. काकाणी, राहुरी
दिनांक :- ६/११/२०२६

वादी
श्री. निशिकांत चंद्रकांत सगळगिळे
प्रतिवादी
श्री. रमाकांत नारायण सगळगिळे

प्रति,
प्रतिवादी - १५ रमेश महादेव कोलते
राहणार - मुसळवाडी रोड, रेल्वे बोगदयाजवळ, टाकळीमिया, ता. राहुरी, जि. अ. नगर

यांसी.....

ज्याअर्थी उपरीनामीत वादी श्री. निशिकांत चंद्रकांत सगळगिळे यांनी प्रतिवादी यांचे विरुध्द सदरचा दावा दाखल केला आहे. त्याअर्थी याद्वारे तुम्हांला फर्मविण्यात येते की, तुम्ही सदर दाव्याचे विरुध्द खुलासा देण्याकरिता दिनांक २१/११/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता व्यक्तीगत किंवा रितसर निर्देशित केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे. तसे न केल्यास उक्त दाव्याची एकतर्फा सुनावणी होउन निकाल दिला जाईल. तुम्हांला अशीही नोटीस देण्यात येते की, तुम्ही वर नमुद तारखेस किंवा त्यापूर्वी बजावणी करण्यास पत्ता देण्यास कसुर केल्यास तुमचा बचाव विचारात घेतला जाणार नाही. दिनांक ०५/११/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयायाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

लिपीक — सही/- — दिवाणी न्यायालय व. स्तर राहुरी.
शिक्का
हुकुमावरून — सही/- — अधिक्षक, — दिवाणी न्यायालय, व. स्तर राहुरी.

जाहीर नोटीस

ने.ता.२८/११/२०२६

नेवासा येथील मे. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग १ यांचे न्यायालयात फौजदारी चौकशी अर्ज नंबर २२९/२०२६

चौकशी अर्ज नंबर २४४ / २०२६ — वि न ८
ॲड. ए.आर.पठाणे
दिनांक :- ४/११/२०२६
मोबा नं. ९८२२०५०९३७

अर्जदार :- शहेनाज बशीर शेख वय ४७,धंदा घरकाम
लग्नानंतरचे नाव शहेनाज रफिक शेख .
रा. घोडेगांव ता.नेवासा जि.अ.नगर
सा.वाले :- मा.निबंधक जन्म मृत्यु नोंदणी तथा मुख्याधिकारी नेवासा नगरपंचायत, नेवासा ता.नेवासा जि.अ.नगर

ज्याअर्थी नेवासा न्यायालयात फौजदारी चौकशी अर्ज नंबर २४४ / २०२६ अर्जदार शहेनाज बशीर शेख वय ४७,धंदा घरकाम लग्नानंतरचे नाव शहेनाज रफिक शेख रा. घोडेगांव ता. नेवासा जि.अ.नगर यांनी जन्म / मृत्यु कायदा १९६९ कलम १३ अन्वये अर्जदार हिचा जन्म दि.०६/०५/१९७९ रोजी मौजे नेवासा खुर्द ता.नेवासा येथे जन्म झालेले आहे. अशी जन्माची नोंद नोंद होवून मृत्युचा दाखला मिळण्यासाठी सदरचा अर्ज मे. कोर्टात दाखल केलेला आहे. तरी सदर अर्जदार यांनी केलेल्या अर्जावर कोणाची हरकत असल्यास सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून दिनांक २८/११/२०२६ रोजी किंवा ३० पर्यंत स्वतः किंवा वकिलामार्फत हजर होवून हरकती करावयात, योग्य मुदतीत कुणीही हरकत या न्यायालयात न दाखविल्यास सदर कोर्ट अर्जदाराचे हक्काबद्दल लगेच पुरावा घेवून त्यांचे जन्माचा तारखेचा हक्क सिद्ध झाल्यास मे. कोर्ट अर्जदाराचे हक्कात आदेश करील. नेवासा

दिनांक :- ४/११/२०२६ — सही/- — तयार करणार
शिक्का
आदेशावरून — सही/- — सहा. अधीक्षक — न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग — नेवासा

जाहीर नोटीस

ने.ता.०२/१२/२०२६

नेवासा येथील मे. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग १ यांचे न्यायालयात फौजदारी चौकशी अर्ज नंबर २२९/२०२६

वि न ८
ॲड. ए.आर.पठाणे
दिनांक :- ३०/१०/२०२६
मोबा नं. ९८२२०५०९३७

अर्जदार :- गुलाब रसुल शेख वय ५५, धंदा मजुरी
रा.भातकुडगांव ता.शेवगांव जि.अ.नगर
ह.मु. नेवासा खुर्द, संभाजीनगर ता. नेवासा जि.अ.नगर
सा.वाले :- मा.निबंधक जन्म मृत्यु नोंदणी तथा मुख्याधिकारी नेवासा नगरपंचायत, नेवासा ता.नेवासा जि.अ.नगर

अर्जदार गुलाब रसुल खुर्द, संभाजीनगर अर्जदाराची मयत आई ज्याअर्थी नेवासा न्यायालयात फौजदारी चौकशी अर्ज नंबर २२९ / २०२६ शेख वय ५५,धंदा मजुरी रा. भातकुडगांव ता. शेवगांव जि.अ.नगर ह.मु.नेवासा ता.नेवासा जि.अ.नगर यांनी जन्म / मृत्यु कायदा १९६९ कलम १३ अन्वये नामे रुबाब रसुल शेख ही दि.०५/१०/२०१६ रोजी मौजे नेवासा खुर्द ता. नेवासा येथे मयत झालेले आहे. अशी मृत्युची नोंद होवून मृत्युचा दाखला मिळण्यासाठी सदरचा अर्ज मे.कोर्टात दाखल केलेला आहे. तरी सदर अर्जदार यांनी केलेल्या अर्जावर कोणाची हरकत असल्यास सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून दिनांक २/१२/२०२६ रोजी किंवा ३० पर्यंत स्वतः किंवा वकिलामार्फत हजर होवून हरकती करावयात. योग्य मुदतीत कुणीही हरकत या न्यायालयात न दाखविल्यास सदर कोर्ट अर्जदाराचे हक्काबद्दल लगेच पुरावा घेवून त्यांचे जन्माचा तारखेचा हक्क सिद्ध झाल्यास मे. कोर्ट अर्जदाराचे हक्कात आदेश करील. नेवासा

दिनांक :- ३०/१०/२०२६ — सही/- — तयार करणार
शिक्का
आदेशावरून — सही/- — सहा. अधीक्षक — न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग — नेवासा

पान १ वरुन

शेवगाव–पैठण रस्त्यावर अपघात

f दली. ही धडक इतकी जबरदस्त होती की, धडकेनंतर पल्सर मोटरसायकलवरील तिघेजण दूरवर फेकले गेले. या अपघातात ओमकार भाऊसाहेब जगधने, अमर रवींद्र जगधने, आणि रोहित रमेश धनुरे (सर्व रा. खानापूर, ता. शेवगाव) हे तिघे तरुण गंभीर जखमी झाले. या अपघातात या तिघा तरुणांचा जागीच मृत्यू झाला. खानापूर येथील हे तीन तरुण दिवाळीच्या खरेदीसाठी शेवगाव येथे चालले होते. तर उसाचा मोकळा ट्रक शेवगाव वरून पैठण कडे जात असताना दुसऱ्या गाडीला ओव्हरटेक करायच्या नादात या तीन तरुणांना जोराची धडक बसली.

नगराध्यक्षांच्या दिराने लिपिकाला भर कार्यालयात चोपले

प्रचंड खळबळ उडाली आहे.याबाबत समजलेली सविस्तर माहिती अशी की, शेवगाव नगरपरिषदेने ऑक्टोबर २०२६ मध्ये १० लाख रुपये किमतीच्या विद्युत साहित्यासाठी निविदा प्रसिद्ध केल्या होत्या. यासाठी अष्टविनायक इलेट्रिकल, संचिता इलेट्रिकल व प्रिम्स इलेट्रिकल (सर्व रा. अहिल्यानगर) या तीन एजन्सींनी निविदा भरल्या होत्या. या तिन्ही निविदांमध्ये गंभीर तांत्रिक त्रुटी आढळून आल्याने विद्युत विभागाचे लिपिक केतन मुरदारे यांनी संबंधित ठेकेदारांना शासकीय ईमेलद्वारे कळवले होते.

खा. निलेश लंके थोरातांच्या भेटीला

राम शिंदे आणि खासदार नीलेश लंके यांनी या राजकीय समीकरणात सहभागी होण्यास नकार दिला. विखे पिता-पुत्रांविषयीची नाराजी हे त्यामागील प्रमुख कारण असल्याचे मानले गेले.

अखेर थोरात-विखे यांच्या पॅनलविरोधात राम शिंदे यांनी दोन जागांवर उमेदवार उभे करून विजय मिळवला, तर नीलेश लंके यांनी स्वतंत्र पॅनलच्या माध्यमातून पारनेरमधून बाजी मारली. विशेष म्हणजे, पारनेरमध्ये विखे समर्थक राहुल शिंदे यांचा लंके यांनी केलेला पराभव विखे गटासाठी धक्कादायक ठरला होता. दुसरीकडे, लोकसभा निवडणुकीत नीलेश लंके यांच्या विजयासाठी बाळासाहेब थोरात यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. असे असतानाही जिल्हा बँकेच्या निवडणुकीत लंके यांनी थोरात-विखे पॅनलविरोधात भूमिका घेतली. मात्र, निकालानंतर त्यांनी थोरात यांच्याविषयीची आपली निष्ठा व्यक्त करताना, 'थोरात कालही नेते होते, आजही आहेत आणि उद्याही राहतील,' अशी स्पष्ट प्रतिक्रिया दिली होती.

या पार्श्वभूमीवर १२ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदाच्या निवडीआधी लंके यांनी थोरात यांची घेतलेली भेट अनेक राजकीय अर्थांनी महत्त्वपूर्ण मानली जात आहे. या भेटीत थोरात यांनी लंके यांचे विजयाबद्दल अभिनंदन केले. दोन्ही नेत्यांनी एकमेकांना दिवाळीच्या शुभेच्छाही दिल्या. मात्र, यापलीकडे कोणती राजकीय चर्चा झाली का, याबाबत अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

दरम्यान, शुक्रवारी पालकमंत्री विखे यांच्या भेटीनंतर सभापती राम शिंदे यांनीही सूचक विधान केले होते. विखे यांनी बँकेच्या निवडणुकीत ज्यांना सोबत घेतले, ते आता त्यांच्या पाठीशी राहतील का, असा सवाल त्यांनी उपस्थित केला होता.

त्यामुळे जिल्हा बँकेच्या अध्यक्षपदाच्या निवडीत विखे-थोरात यांची एकजूट कायम राहणार की नव्या राजकीय समीकरणांना जन्म मिळणार, तसेच लंके आणि शिंदे यांच्या भूमिकेमुळे सत्तेची गणिते बदलणार का, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण

विखे-शिंदे भेटीनंतर लंके-थोरात भेटीने जिल्हा बँकेच्या राजकारणातील हालचालींना वेग आला आहे. या भेटी केवळ दिवाळीच्या शुभेच्छांपुरत्या मर्यादित आहेत की अध्यक्षपदाच्या निवडीसाठी पडद्यामागे नवी जुळवाजुळव सुरू झाली आहे, याची उत्सुकता आता शिगेला पोहोचली आहे.

तरुणाच्या खून प्रकरणात पुन्हा आठ जणांना अटक

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

वैजापूर : जुन्या वादातून पेटलेल्या संघर्षाने एका तरुणाचा जीव घेतल्यानंतर वैजापूर शहरात निर्माण झालेल्या संतापाची अखेर पोलिसांच्या कारवाईने दखल घेतली आहे. रोहित अनिल पठारे खून प्रकरणात पोलिसांनी आठ जणांना नव्याने अटक केली असून यापूर्वी पकडलेल्या दोघांसह अटकेतील आरोपींची संख्या दहा झाली आहे. शनिवारी सर्व आरोपींना न्यायालयात हजर केले असता त्यांना १६ नोव्हेंबरपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश देण्यात आले. मात्र, या प्रकरणातील आणखी काही आरोपी फरार असल्याने तपासाचे आव्हान कायम आहे. या प्रकरणात अमन सत्यपाल उंटवाळ, आनंद संतोष मथुरे उर्फ राजपूत, अमर मदनसिंग राजपूत, शंकर उर्फ प्रतीक राजू राजपूत, गजू उर्फ गजेंद्र रविंद्रसिंग राजपूत, क्रिश प्रितमसिंग राजपूत, लोकेश उर्फ सोनू गबरसिंग राजपूत आणि प्रमोद ज्ञानेश्वर वाघचौरे यांना अटक करण्यात आली. मयूर बाबासाहेब राहणे (रा. भगाव) आणि विशाल सामदास कडे (रा. शिवाजीनगर, जुना चांडगाव) यांना यापूर्वीच अटक झाली होती.



।अमन उंटवाळ याचा शोध घेत असताना तो शहर टाकळी येथील निर्जन भागातील एका बंद घरात लपून बसल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी तत्काळ सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. या प्रकरणातील आरोपींचा शोध घेण्यासाठी राज्यातील विविध भागांसह परराज्यांतही तपास पथकांनी धाव घेतली. अन्य फरार आरोपींच्या अटकेसाठी शोधमोहीम सुरूच आहे.दरम्यान ३१ ऑक्टोबर रोजी जुन्या गणेश विसर्जन मिरवणुकीच्या वादातून दोन गटांत झालेल्या संघर्षात रोहित पठारे गंभीर जखमी झाला होता. त्यानंतर ४ नोव्हेंबर रोजी त्याचा मृत्यू झाला. गुन्हे दाखल होऊनही आरोपींच्या अटकेस विलंब होत असल्याने मृताच्या नातेवाईकांनी आणि मित्रांनी आक्रमक भूमिका घेतली. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव यांनी रोहितच्या कुटुंबीयांची भेट घेतली आणि कठोर कारवाईचे आश्वासन दिले. आयपीएस अधिकारी अपराजित अग्निहोत्री यांनी तपासासाठी नियुक्त पाच पथकांतील मनुष्यबळ वाढवून त्यांची पुनर्रचना केली. पथकांच्या हालचाली गोपनीय ठेवण्यात आल्या. स्थानिक गुन्हे शाखा आणि वैजापूर पोलिसांच्या समन्वयातून ही कारवाई करण्यात आली. पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी भागवत फुंदे करीत आहेत. दहा आरोपींच्या अटकेनंतर आता उर्वरित आरोपींचा शोध आणि हल्ल्यामागील संपूर्ण घटनाक्रम उघड होण्याची प्रतीक्षा आहे.

रोहित पठारे प्रकरणातील आरोपींना शनिवारी न्यायालयात हजर करण्यासाठी आणले जात असल्याची माहिती मिळताच काही नागरिकांनी उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयात धाव घेतली. संतप्त नागरिकांनी आरोपींविरोधात घोषणाबाजी करत घटनेचा निषेध केला. यावेळी काही आंदोलकांनी थेट आरोपींच्या दिशेने धाव घेतल्याने परिस्थिती तणावपूर्ण बनली. पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करीत आंदोलकांना रोखले आणि पुढील अनुचित प्रकार टाळला.

प्रेरणाची आर्थिक शिस्त व विश्वासार्ह कारभाराचा जिल्ह्यात नावलौकिक : आ. सत्यजित तांबे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

राहुरी : गुहा येथील प्रेरणा ग्रामीण सहकारी पतसंस्थेच्या मुख्य शाखेस पदवीधर मतदारसंघाचे आमदार सत्यजित तांबे यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी संस्थेचे चेअरमन सुरेश वाबळे यांच्या हस्ते आमदार सत्यजित तांबे यांचा सन्मानपूर्वक सत्कार करण्यात आला. या भेटीच्या निमित्ताने सहकार क्षेत्रातील वाटचाल, ग्रामीण भागातील आर्थिकविकास, सामाजिक उपक्रम तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातील विविध प्रश्नांवर मनमोकळी चर्चा झाली.

यावेळी आमदार सत्यजित तांबे यांनी प्रेरणा पतसंस्था व मल्टिस्टेटच्या कामकाजाची माहिती जाणून घेतली. सहकार क्षेत्रात काम करताना सभासदांचा विश्वास संपादन करणे, आर्थिक व्यवहारांमध्ये पारदर्शकता ठेवणे आणि संस्थेच्या कामकाजात शिस्त राखणे अत्यंत महत्त्वाचे असते. प्रेरणा पतसंस्था व मल्टिस्टेटने या बाबींना प्राधान्य देत आपली विश्वासार्ह ओळख निर्माण केली आहे. संस्थेचा शिस्तबद्ध कारभार आणि विश्वासार्हतेमुळे जिल्ह्यात नावलौकिक निर्माण झाला असल्याचे गौरवोद्गार आमदार सत्यजित तांबे यांनी यावेळी व्यक्त केले.संस्थेचे संस्थापक चेअरमन सुरेश वाबळे यांनी संस्थेच्या आजवरच्या वाटचालीची, कार्यपद्धतीची तसेच सभासदांना दिल्या जाणाऱ्या विविध आर्थिक सुविधांची माहिती आमदार तांबे यांना दिली. संस्थेने जपलेली विश्वासार्हता, सभासदांशी असलेले जिव्हाळ्याचे संबंध आणि सहकार क्षेत्रातील योगदान याबाबतही यावेळी चर्चा झाली. यावेळी विष्णुपंत वरपे, अशोक उरहे, शरद वाबळे, दत्तात्रय शेळके, राजेंद्र बोरुडे, चंद्रे यांच्यासह संस्थेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



टाकळीभान सोसायटी कर्जमाफीपासून वंचित

शेतकऱ्यांच्या कर्ज प्रकरणी सहकार्य करू : राहुल पटारे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

टाकळीभान : श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान सोसायटी मधील ११२ शेतकरी कर्जदारांचा कर्जमाफी पासून वंचित राहिल्याबाबतचे निवेदन तक्रार अर्ज सहाय्यक निबंधक श्रीरामपूर यांकडे शेतकऱ्यांनी दिला आहे. तसेच सदर तक्रारी बाबतचे म्हणणे अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पा. यांच्याकडे शेतकऱ्यांनी मांडले आहे.या कामी पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी या प्रकरणाची निपक्षपातीपणे चौकशी करून या शेतकऱ्यांना कर्जमाफी पासून वंचित शेतकऱ्यांना न्याय देण्याच्या भूमिकेतून टाकळीभान सोसायटी कर्ज विभाग खाते तपासून या वंचित शेतकऱ्यांना योग्य तो न्याय निवाडा करण्याचे आदेश संबंधित विभागाला दिले होते. त्यांच्या आदेशानुसार टाकळीभान सोसायटीच्या कर्ज खाते तपासणीसाठी नवीन लेखापरीक्षांची नेमणूक होऊन त्यासंदर्भात कर्ज खात्यांची तपासणी सुरू आहे. या संदर्भात सोसायटीचे विद्यमान चेअरमन राहुल पटारे म्हणाले की आम्ही सर्व संस्थेचे पदाधिकारी, चेअरमन ,व्हा चेअरमन ,संचालक मंडळ, सचिव या कर्ज विभाग, व्यवहार तपासणी संदर्भात आम्ही सर्व सहकार्य करत असून या प्रकरणाचा योग्य तो तपास होऊन शासनाच्या नियमाप्रमाणे व सत्य असेल त्याप्रमाणे न्याय होईल. आम्ही कर्जमाफी पासून वंचित राहिलेल्या सर्व शेतकऱ्यांच्या पाठीशी आहोत, त्यांना लागेल ती मदत करणार असून त्यांना पूर्ण सहकार्य करणार असल्याचे मत व्यक्त केले आहे. त्यानिमित्ताने सोसायटीचा वसूल होणार आहे. तसेच सोसायटी ही गावची कामधेनू असून शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करणारी गावची महत्त्वाची आर्थिक नाडी आहे, यासाठी कर्जदार व सभासदांनी संस्थेला आर्थिक पाठबळ देण्यासाठी काढलेले कर्ज काळजीपूर्वक वेळेत भरून आपले व्यवहार सुरळीत ठेवावेत, जेणेकरून संस्था भक्कम होईल. त्याचप्रमाणे २०२६ च्या चालू कर्जमाफीमध्ये पात्र सर्व कर्जदारांना शेतकरी कर्जमाफीचा लाभ देण्यासाठी यासंदर्भात सोसायटीचे पदाधिकारी व कर्मचारी प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले.तसेच शेतकरी बांधवांनी ही आपली कर्जमाफीची प्रक्रियेची पडताळणी वेळोवेळी करून घ्यावी, व शासनाच्या योजनांचा लाभ ठराविक कालावधी पुरता असल्याने हा लाभ घेण्यासाठी जागरूक राहून कर्जमाफी योजनेचा लाभ घ्यावा.



प्रणव कोरडेची राष्ट्रीय टेनिसमध्ये उच्चभरारी



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

छत्रपती संभाजीनगर : आंध्र प्रदेशातील भीमावरम येथे झालेल्या अखिल भारतीय आयटा पुरुष २.५ लाख राष्ट्रीय मानांकन टेनिस स्पर्धेत छत्रपती संभाजीनगरचा प्रणव कोरडे याने पुरुष दुहेरीत उपविजेतेपद पटकावले. यंदाच्या वर्षातील प्रणवची ही सलग चौथी अंतिम फेरी असून, यापूर्वी त्याने तीन स्पर्धांमध्ये विजेतेपद मिळवले आहे. २ ते ७ नोव्हेंबरदरम्यान कॉस्मो क्लबमध्ये झालेल्या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात प्रणव कोरडे आणि नैसिक रेड्डी जोडीने अव्वल मानांकित प्रसाद इंगळे व परितोष पवार यांना कडवी झुंज दिली. पहिला सेट ७-६ ने जिंकणाऱ्या प्रणवच्या जोडीला दुसऱ्या सेटमध्ये ४-६ अशी हार पत्करावी लागली. निर्णायक सुपर टायब्रेकरमध्येही ९-११ अशा निसटत्या फरकाने पराभव झाल्याने उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. स्पर्धेत प्रणवच्या जोडीने उपांत्य फेरीत अमित मुंड व वंश नंदल यांचा ६-३, ६-२ असा पराभव केला होता. प्रणवला प्रशिक्षक गजेंद्र भोसले यांचे मार्गदर्शन लाभत असून, हैदराबाद येथील सुरेश कृष्णा टेनिस अकादमीत तो आगामी आंतरराष्ट्रीय आयटीएफ व एटीपी स्पर्धांसाठी सराव करीत आहे. त्याच्या यशाबद्दल विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी अभिनंदन केले.

निधनवार्ता

मीराबाई गाढवे



चांदा : नेवासा तालुक्यातील चांदा येथील मिराबाई नीक गाढवे (वय ६४) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, दोन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

सुशीलाबाई बोहरा



श्रीरामपूर : दिगंबरचे समाजातील जेष्ठ सामाजिक सुशीलाबाई प्रेमचंदजी बोहरा (वय ८१) यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, तीन मुली, जावई, नातवंडे, पुतणे असा मोठा परिवार होता.

रोटरी क्लब श्रीरामपूरचे माजी अध्यक्ष प्रेमचंद बोहरा यांच्या धर्मपत्नी तर दिगंबर जैन समाजाचे माजी विश्वस्त प्रशांत बोहरा यांच्या मातोश्री होत. नेमिचंद अशोक बोहरा यांच्या भावजई होत.

शाश्वत शेतीसाठी जैविक व सेंद्रिय निविष्ठांचा वापर वाढवा : डॉ. सुरेश दोडके

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

राहुरी : जमिनीचे आरोग्य, जैवविविधता आणि सुपीकता टिकवून ठेवण्यासाठी शेतकऱ्यांनी जैविक व सेंद्रिय निविष्ठांचा वापर वाढविणे आवश्यक आहे. रब्बी हंगामातील पिकांच्या व्यवस्थापनासाठी पाणी व खतांचे काटेकोर नियोजन करून उपलब्ध संसाधनांचा कार्यक्षम वापर करावा. जैविक व सेंद्रिय निविष्ठांच्या वापरामुळे उत्पादन खर्च कमी होण्यासोबतच जमिनीची सुपीकता आणि दीर्घकालीन उत्पादकता टिकवून ठेवण्यास मदत होते, असे प्रतिपादन महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. सुरेश दोडके यांनी केले.

धनत्रयोदशीच्या मंगलमय पर्वाचे औचित्य साधून महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरीचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या मार्गदर्शनाखाली व विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे यांच्या नेतृत्वाखाली विद्यापीठाचा भाकृअप-शेतकरी प्रथम प्रकल्प, कडधान्य सुधार प्रकल्प आणि कृषी विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने फुले समृद्ध गाव तांभेरे येथे शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महात्मा जोतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाचे औचित्य साधून आणि 'खेत वाचवा' अभियानांतर्गत तांभेरे व कानडगाव येथील शेतकऱ्यांसाठी 'हरभरा व रब्बी ज्वारीचे सुधारित उत्पादन तंत्रज्ञान' या विषयावर हे प्रशिक्षण घेण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून डॉ. दोडके बोलत होते. यावेळी कृषी तंत्रज्ञान माहिती केंद्राचे व्यवस्थापक डॉ. पंडित खर्डे, शेतकरी प्रथम प्रकल्पाचे सहसमन्वयक तथा प्रसारण केंद्र प्रमुख डॉ. सचिन सदाफळ, ज्वारी कृषीविद्यावेत्ता डॉ. दत्तात्रय पाचरणे, कीटकशास्त्रज्ञ डॉ. महेश भारती, हळगाव कृषी महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. गोकुळ वामन, मेंढी प्रकल्प प्रमुख डॉ. रवींद्र निमसे, सहाय्यक कृषी अधिकारी प्रभात अंत्रे आणि प्रगतशील शेतकरी लक्ष्मण गागरे उपस्थित होते.

प्रशिक्षणामध्ये तज्ज्ञांनी विविध विषयांवर शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. पंडित खर्डे यांनी 'फुले समृद्ध गाव' या संकल्पनेची उद्दिष्टे व महत्त्व विशद करून प्रास्ताविक केले. डॉ. दत्तात्रय पाचारणे यांनी रब्बी ज्वारी उत्पादन तंत्रज्ञानाची पंचसूत्री स्पष्ट करून अधिक उत्पादनासाठी आवश्यक बाबींची माहिती दिली. डॉ. महेश भारती यांनी हरभरा पिकातील एकात्मिक कीड व्यवस्थापन व सुधारित पीक व्यवस्थापन तंत्रज्ञानाविषयी मार्गदर्शन केले. तसेच बीजप्रक्रियेचे प्रात्यक्षिक सादर करून शेतकऱ्यांना त्याचे महत्त्व पटवून दिले. डॉ. सचिन सदाफळ यांनी विद्यापीठामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध कृषी विस्तार व शेतकरी हिताच्या उपक्रमांची माहिती दिली. सहाय्यक कृषी अधिकारी प्रभात अंत्रे यांनी कृषी विभागाच्या विविध शासकीय योजनांची माहिती देऊन शेतकऱ्यांनी त्यांचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

५० हजारांच्या हुंड्यासाठी विवाहितेचा छळ; पतीसह पाच जणांविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

वैजापूर : लग्नात दिलेल्या हुंड्यातील राहिलेले ५० हजार रुपये आणण्यासाठी विवाहितेचा सातत्याने मानसिक आणि शारीरिक छळ केल्याचा धक्कादायक प्रकार गाढेपिंपळगाव येथे उघडकीस आला आहे. लग्न होऊन अवघे सहा महिने झालेल्या २१ वर्षीय शुभांगी वाघचौरे हिचा सासरच्या मंडळींकडून पैशांसाठी छळ केला जात असल्याचा आरोप तिच्या आईने केला आहे. या त्रासाला कंटाळून शुभांगीने टोकाचे पाऊल उचलल्याची फिर्याद दिल्यानंतर पतीसह सासरच्या पाच जणांविरुद्ध विरगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



।शुभांगी गौरव वाघचौरे (२१, रा. गाढेपिंपळगाव, ता. वैजापूर) असे मृत विवाहितेचे नाव आहे. तिची आई नीता रवळे (रा. जातेगाव, ता. नांदगाव, जि. नाशिक) यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, शुभांगीचे सहा महिन्यांपूर्वी लग्न झाले होते. मात्र, लग्नानंतर अवघ्या महिनाभरातच सासरच्या मंडळींनी हुंड्यातील राहिलेले ५० हजार रुपये आणण्यासाठी तिच्याकडे तगादा सुरू केला. माहेरून पैसे आणावेत, यासाठी तिच्यावर वारंवार दबाव टाकण्यात येत होता. या मागणीवरून तिला मानसिक व शारीरिक त्रास दिला जात होता. शिवीगाळ करण्यासह जीवे मारण्याच्या धमक्याही दिल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.नव्या संसाराची स्वप्ने घेऊन सासरी आलेल्या शुभांगीला लग्नानंतर काही दिवसांतच हुंड्याच्या पैशांसाठी छळाला सामोरे जावे लागल्याचे फिर्यादीत नमूद आहे. सासरच्या मंडळींकडून होणाऱ्या कथित छळाला कंटाळून शनिवारी (दि. ७) पहाटे दोन वाजेच्या सुमारास गाढेपिंपळगाव येथे तिने टोकाचे पाऊल उचलले.या प्रकरणी गौरव संजय वाघचौरे, संजय लक्ष्मण वाघचौरे, विमल संजय वाघचौरे, नवनाथ संजय वाघचौरे आणि शितल नवनाथ वाघचौरे (सर्व रा. गाढेपिंपळगाव) यांच्याविरुद्ध विरगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास विरगाव पोलिस करीत आहेत.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

नशिबाची परिक्षा

रविवार दि. ८ नोव्हेंबर २०२६

मिलनम डे

उदय-अस्त	सिंगल ५-१-९ मजबुत	
१२० ४३० ६७०	३-४	१५८ २४८ २२०	३६-८४-७१-२०-४९

कल्याण

उदय-अस्त	सिंगल ९-४-५ मजबुत	
१९० २८० २२६	०-२	१५६ १२९ ११०	०६-३२-४८-७५-२९

मुंबैम (मेन)

उदय-अस्त	सिंगल ४-७-९ मजबुत	
१२५ २६० २३४	८-१	१२८ १४६ १००	८६-२१-५४-९७-१०

माधुरी बाजार डे / नाईट

२६७ ३८९ ०१६०	५-५४	७८० ५५४ ४७९५	४० - ५० - २८-२४

२ - ६ - ०

शुभ लाभ

Date	Mon		Tue		Wed		Thu		Fri	
27/07/2026 to 31/07/2026	259	60	590	42	358	62	400	47	160	70
03/08/2026 to 07/08/2026	234	90	679	85	338	42	460	09	378	05
10/08/2026 to 14/08/2026	577	99	234	53	148	70	550	39	133	76
17/08/2026 to 21/08/2026	240	60	678	73	346	82	480	23	779	77
24/08/2026 to 28/08/2026	360	96	555	23	289	42	450	98	406	41
31/08/2026 to 04/09/2026	149	43	700	81	560	52	336	50	235	99
07/09/2026 to 11/09/2026	680	47	578	27	124	26	112	43	779	33
14/09/2026 to 18/09/2026	789	47	124	20	136	56	678	42	345	16
21/09/2026 to 25/09/2026	390	25	348	62	129	23	480	30	799	60
28/09/2026 to 02/10/2026	669	19	135	18	279	84	260	29	567	84
05/10/2026 to 09/10/2026	140	57	250	85	459	48	130	99	669	84
12/10/2026 to 16/10/2026	160	79	568	11	290	58	122	46	189	42

माधुरी बाजार डे

१७९
७७
१२४

माधुरी बाजार नाईट

४६८
८२
१५६

ढोरसडे - शहर टाकळी रस्त्यावर अतिक्रमण सार्वजनिक बांधकामचे दुर्लक्ष ; ग्रामपंचायतही अनभिज्ञ

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

दहिगाव ने : ढोरसडे एक धरणग्रस्त गाव, सार्वजनिक सोयी सुविधा पासून अगदीच अलिप्त. जाण्यासाठीचा रस्ता खड्याच्या आहारी गेलाय. रस्त्याची ठिकठिकाणी दैनिय अवस्था खड्या मुळे झाली आहे. या रस्त्याचे नुतनीकरण सोडा साधे खड्डे बुजवण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग आजपर्यंत धजावला नसुन, बांधकाम विभागाचे साफ दुर्लक्ष झाले आहे. आज मोठ्या प्रमाणावर या रस्त्यावर ऊस वाहतूक सुरू आहे. वाहन चालकाला वाहन चालवताना तारेवरची कसरत करावी लागते आहे. तर प्रवासी वर्ग जिव मुठीत धरून रोजच या रस्त्यावरुन जा- ये करत आहेत. स्थानिक शेतकरी रस्ता दुरुस्ती ची मागणी करत आहेत. मात्र स्थानिक ग्रामपंचायत मात्र साधा पाठपुरावा करण्यासही धजावली नसल्याची वस्तुस्थिती आहे. ढोरसडे - शहर टाकळी (अडीच तीन किमी अंतर) या रस्त्यावर जवळपास सर्व ठिकाणी काटेरी झुडपे यांचे मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण झाले आहे. आज या रस्त्यावर वाहने झुडपांना घासुनच जात आहेत. यामुळे वाहनांचे मोठे नुकसान होते आहे. समोरुन येणारे वाहन वळणावर तर अजिबातच दिसत नसल्याने, छोटे- मोठे अपघात नेहमीच होत असतात. शालेय मुलांना या रस्त्यावर चा प्रवास म्हणजे दुखापत झाल्याशिवाय राहत नाही. अशा या रस्त्यावर चे झुडपांचा रस्त्यावर झालेला अधिवास कधी संपेल या प्रतिक्षेत नागरिक आहेत. सार्वजनिक बांधकाम विभाग याकडे लक्ष देईल का?, ग्रामपंचायत पाठपुरावा करेल का ? रस्ता झुडपापासुन अतिक्रमण मुक्त होऊन मोकळा श्वास घेईल का? आणि नागरीकांना सुरक्षित प्रवास करता केव्हा येईल याकडे नागरीकांचे लक्ष लागले आहे.

झुडपांच्या आडोशाला विध्यार्थी अपहरणाचा प्रयत्न

रस्ता काटेरी व इतर झाडा झुडपा मुळे अरुंद झाला आहे. ठिकठिकाणी रस्ता खराब (मोठाले खड्डे पडले आहेत.) झाला असून, झुडपाच्या अडचणीत रस्ता हरवत चालला आहे. याच दाटिच्या रस्त्यावर काही महिन्यांपूर्वी शालेय विद्यार्थ्यांचा अपहरण करण्याचा प्रयत्न झाला होता. समोरासमोर वाहने धडकण्याचे प्रकार वाढले असून रस्ता झाडांच्या फांद्या पासून अतिक्रमण मुक्त व्हावा ही अपेक्षा नागरिक बाळगून आहेत.



dpbosssss.live
Mydpboss.com

द•ख•ल



ख्रिस्ती समाजाच्या दफनभूमीच्या स्वच्छतेची उपमहापौर यांनी घेतली दखल!

अहिल्यानगर : शहरातील सिद्धार्थनगर येथील ख्रिस्ती समाजाच्या दफनभूमीच्या दुरवस्थेची दखल घेत उपमहापौर धनंजय जाधव आणि महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्या पुढाकारातून दफनभूमी परिसराची स्वच्छता करण्यात आली. प्रशासनाने घेतलेल्या या सकारात्मक भूमिकेबद्दल अहमदनगर पहिली मंडळी ख्रिस्ती समाजाच्या वतीने उपमहापौर धनंजय जाधव यांचा भव्य सत्कार करून आभार व्यक्त करण्यात आले. यावेळी ख्रिस्ती समाजाच्या वतीने दफनभूमीच्या सर्वांगीण विकासाचा प्रश्न उपस्थित करण्यात आला. सिद्धार्थनगर येथील दफनभूमीचे सुशोभीकरण करून परिसरात विद्युत खांबांची व्यवस्था, अंतर्गत रस्त्यांची निर्मिती, सभा हॉल उभारणी तसेच पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे उपमहापौर धनंजय जाधव यांच्याकडे करण्यात आली. याप्रसंगी बोलताना उपमहापौर धनंजय जाधव यांनी ख्रिस्ती समाजाच्या विविध विकासकामांसाठी आवश्यक निधी उपलब्ध व्हावा, यासाठी पालकमंत्र्यांकडे मोठ्या निधीची मागणी करण्यात येईल, असे आश्वासन दिले. तसेच दफनभूमीच्या सुशोभीकरणासाठी आवश्यक त्या विकासकामांचा पाठपुरावा करण्याची भूमिका त्यांनी व्यक्त केली. या सत्कारप्रसंगी रेव्हरंड सनी मिसाळ, रेव्हरंड संजय मिसाळ, प्रसाद काळे, शाहुल बनकर, ठोंबरे सर, अमोल काळे, लोकेश बर्वे, नितीन खंडागळे, विजय सतराळकर, राजू देठे, विनीत मकासरे, दीपक साळवे, रमेश भोसले, राजेश उजागरे, पास्टर विजय काकडे, सुनील बनसोडे, विशाल केदारी, राजेश ओहोळ यांच्यासह ख्रिस्ती समाजातील अनेक प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

दिवाळीत पर्यावरणाचा जागर; 'हरित श्रीमंत भारत' घडविण्याचा निर्धार!

अहिल्यानगर : भीमाशंकर-सह्याद्री परिसरातील वनसंपदेची होत असलेली कथित वृक्षतोड थांबवून पर्यावरणाचे रक्षण करावे, तसेच लोकाभिमुख आणि कर्तव्यनिष्ठ प्रशासन निर्माण व्हावे, या मागणीसाठी पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसद यांच्या वतीने शुक्रवारी (दि. ६ नोव्हेंबर) अहिल्यानगर येथील हुतात्मा स्मारकात अनोख्या पद्धतीने 'वनत्रयोदशी' साजरी करण्यात आली. यावेळी वृक्षतोडीला जबाबदार असलेल्या सत्ताप्रवृत्तीचा निषेध करण्यासाठी 'दुर्योधनी सत्तेच्या खुर्ची'चे प्रतीकात्मक पाय कापण्यात आले. तसेच लोकशाहीच्या पंचमहाभूतांचे प्रतीक असलेल्या पाच पणत्यांचे दीपप्रज्वलन करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. प्रत्येक घराच्या अंगणात पावसाचे पाणी जमिनीत मुरविण्यासाठी एक 'रेन गेन बॅटरी' आणि किमान दोन झाडे लावून 'हरित श्रीमंत भारत' घडविण्याचा देशव्यापी संकल्प यावेळी करण्यात आला. या आंदोलनात ॲड. कारभारी गवळी, वीरबहादूर प्रजापती, अशोक सब्बन, राहुल आढाव, विठ्ठल ठुबे, शाहीर कान्हू सुंबे, पोपट भोसले, आनंदा आढाव, बाळासाहेब पालवे, अशोक भोसले, आसाराम सातपुते, नंदा कुलट, आसाराम बर्डे, विलास बर्डे, हिरामन गायकवाड, बबलू खोसला, दत्तात्रय साबळे आदी सहभागी झाले होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित सामाजिक कार्यकर्त्यांनी हुतात्मा स्मारकाला पुष्पांजली अर्पण करून देशासाठी बलिदान दिलेल्या हुतात्म्यांना अभिवादन केले. त्यानंतर लोकभक्ती, ज्ञानभक्ती, कर्मभक्ती, संवैधानिक नैतिकता आणि कायद्याचे राज्य या लोकशाहीच्या पाच मूलभूत मूल्यांचे प्रतीक म्हणून पाच पणत्या प्रज्वलित करण्यात आल्या. लोकशाही ही केवळ सत्तेची व्यवस्था नसून ती जनतेप्रती असलेली जबाबदारी आणि नैतिकतेवर आधारित असली पाहिजे. शासनकर्ते आणि प्रशासनातील प्रत्येक घटकाने या मूल्यांच्या प्रकाशात काम करावे, असा संदेश यावेळी देण्यात आला.

ॲड. स्वाती जाधव यांना राज्यस्तरीय 'कर्तृत्ववान मराठा नवदुर्गा' पुरस्कार



अहिल्यानगर : अखंड मराठा साम्राज्य फाउंडेशन (ट्रस्ट) यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय 'कर्तृत्ववान मराठा नवदुर्गा सन्मान सोहळा २०२६' मध्ये शिवसेना महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख अँड. स्वाती राजेंद्र जाधव यांना त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक कार्याबद्दल सन्मानित करण्यात आले. पुणे येथील भारतरत्न पंडित भीमसेन जोशी कलामंदिर, औंधगाव येथे मान्यवरांच्या उपस्थितीत हा गौरव सोहळा उत्साहात पार पडला. अँड. स्वाती राजेंद्र जाधव यांनी सामाजिक क्षेत्रासह राजकीय क्षेत्रातही सक्रिय सहभाग घेत विविध समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून आपले कार्य सुरू ठेवले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना राज्यस्तरीय पुरस्काराने गौरविण्यात आले. या सन्मानामुळे भविष्यात अधिक जोमाने सामाजिक कार्य करण्यासाठी नवी ऊर्जा आणि प्रेरणा मिळाली असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. अँड. स्वाती राजेंद्र जाधव यांनी सामाजिक क्षेत्रासह राजकीय क्षेत्रातही सक्रिय सहभाग घेत विविध समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून आपले कार्य सुरू ठेवले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना राज्यस्तरीय पुरस्काराने गौरविण्यात आले. या सन्मानामुळे भविष्यात अधिक जोमाने सामाजिक कार्य करण्यासाठी नवी ऊर्जा आणि प्रेरणा मिळाली असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

नगरमध्ये १२ ते १८ नोव्हेंबरदरम्यान भव्य शिवमहापुराण कथा सप्ताह!

अहिल्यानगर : पुढील पिढीला केवळ संपत्तीच नव्हे, तर धार्मिक आणि नैतिक संस्कारांचाही वारसा मिळावा, या उदात्त उद्देशाने अहिल्यानगर शहरात १२ ते १८ नोव्हेंबरदरम्यान भव्य श्री शिवमहापुराण कथा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. श्री सिद्धेश्वर महादेव मंदिर आणि श्री साई द्वारका सेवा ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने हा सातदिवसीय आध्यात्मिक सोहळा आयोजित करण्यात आला आहे. दिल्लीगेट परिसरातील सातभाई मळा येथील डी.एड. कॉलेज मैदानावर दररोज सायंकाळी ६ ते रात्री ९ या वेळेत शिवमहापुराण कथेचे निरूपण होणार आहे. श्रीरामकृष्ण परमहंस सेवा प्रतिष्ठान, केज (जि. बीड) येथील सुप्रसिद्ध कथाप्रवक्ते ह.भ.प. समाधानजी महाराज शर्मा आपल्या रसाळ वाणीतून शिवमहापुराणाचे निरूपण करणार आहेत. या आध्यात्मिक सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे उपस्थित भाविकांना ११ हजार पंचमुखी रुद्राक्षांचे वाटप करण्यात येणार आहे. तसेच दररोज कथा संपल्यानंतर सर्व भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे.

अहिल्यानगरमध्ये ऑल आऊट ऑपरेशन

माळीवाडा बस स्थानकाजवळ सारंग पानस्टॉलवर कारवाई करत ४ हजार ४१० रुपयांचा प्रतिबंधित गुटखा जप्त

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



अहिल्यानगर : शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी कोतवाली पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने शुक्रवारी रात्री उशिरा राबवलेल्या ऑल आऊट ऑपरेशन दरम्यान मोठी कारवाई केली आहे. शहरात प्रतिबंधित अन्नपदार्थांची अवैध विक्री करणाऱ्यांवर कठोर पावले उचलत पोलिसांनी माळीवाडा बस स्थानकासमोर असलेल्या सारंग पानस्टॉलवर अचानक छापा टाकला. पोलीस शिपाई दीपक जगन्नाथ मिसाळ यांच्या फिर्यादीनुसार, या कारवाईत आरोपी शकील उर्फ गुल्लु हमीद सय्यद (वय ५२, रा. स्टेशन रोड, इम्पीरिअल चौक, अहिल्यानगर) याला रंगेहात ताब्यात घेण्यात आले आहे. आरोपीकडून अन्न व औषध प्रशासनाच्या आदेशानुसार महाराष्ट्र राज्यात विक्रीस पूर्णपणे प्रतिबंधित असलेला आणि मानवी शरीरास अपायकारक असलेला विमल, गोवा, आरएमडी, रजनीगंधा, डायरेक्टर स्पेशल आणि सम्राट नावाचा सुगंधी पान मसाला व गुटखा जप्त करण्यात आला आहे. पंचांसमक्ष करण्यात आलेल्या या कारवाईत एकूण ४ हजार ४१० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून रासायनिक तपासणीसाठी त्याचे नमुने स्वतंत्रपणे सीलबंद करण्यात आले आहेत. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम १२३, २२३, २७४ आणि २७५ अन्वयोर गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील कायदेशीर तपास पोलीस उपनिरीक्षक दीपक मेढे करत आहेत.

विद्यार्थ्यांची अनोखी दिवाळी; किराणा, कपडे, अन्नधान्य व जीवनावश्यक वस्तूंचे वाटप



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : दिवाळी म्हणजे केवळ दिव्यांची रोषणाई, फटाक्यांचा आनंद आणि नवीन कपड्यांची खरेदी नव्हे, तर आपल्या आनंदात इतरांनाही सहभागी करून घेण्याचा आणि माणुसकीचा प्रकाश सर्वत्र पसरविण्याचा सण आहे. हाच दिवाळीचा खरा अर्थ कृतीतून जपत केडगाव येथील जेएसएस गुरुकुलच्या विद्यार्थ्यांनी आरणगाव येथील मानव सेवा प्रकल्पातील वंचितांसोबत दिवाळी साजरी केली. विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी जपत किराणा साहित्य, कपडे, अन्नधान्य, साफसफाईचे साहित्य तसेच दैनंदिन वापरातील विविध जीवनावश्यक वस्तू भेट देत गरजूंच्या चेहऱ्यावर आनंद फुलविला. प्राचार्य आनंद कटारिया आणि निकिता कटारिया यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेला हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी केवळ मदतकार्य न ठरता माणुसकी, संवेदनशीलता आणि सामाजिक जबाबदारीचे संस्कार देणारा अनुभव ठरला. दिवाळीच्या सणाचा आनंद प्रत्येकाला मिळावा आणि समाजातील वंचित घटकांनाही सणाचा गोडवा अनुभवता यावा, या उद्देशाने जेएसएस गुरुकुलच्या वतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी प्राचार्य आनंद कटारिया यांनी विद्यार्थ्यांना आपापल्या घरून शक्य होईल त्या स्वरूपात मदत घेऊन येण्याचे आवाहन केले होते.

देव, देश, धर्म संकल्पनेतून भक्ती आणि फ्युजन संगीताचा अनोख्या संकल्पनेतून झाले भक्तीगीतांचे सादरीकरण

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



अहिल्यानगर : अनाहत एक कलासृष्टी आयोजित 'द भक्ती बीट्स 'भजन जॅमिंग अँड फ्युजन महावीर ग्रुप यांच्या विशेष सहकार्यातून, तसेच विचार भारती आणि समर्थ सत्संग परिवार यांच्या विशेष सहयोगातून या सांगीतिक सोहळ्याचे आयोजन माऊली सभागृह येथे करण्यात करण्यात आले होते.पारंपरिक भारतीय वाद्ये व पाश्चात्य वाद्ये यांचा सुंदर मिलाफ,भक्तिसंगीताचा आध्यात्मिक गंध, भक्तिरसाने ओथंबलेले शब्द आणि आधुनिक संगीताचा दमदार ठेका यांचा अनोखा संगम अनुभवण्याची संधी अहिल्यानगरकरांना मिळाली.

कार्यक्रमाची सुरुवात 'आई गिरी नंदिनी' या देवीच्या भक्तिगीताने झाली. देवीला नमन करून सुरू झालेल्या या मैफलीत पुढे 'हनुमान चालीसा'च्या सादरीकरणाने संपूर्ण सभागृह भक्तिरसात न्हाऊन निघाले. 'मंगल भवन अमंगल हारी' या भगवान श्रीरामांच्या गीताने सभागृहात 'जय श्रीराम'चा जयघोष घुमला. 'राम नाम जप' या गीतालाही रसिकांनी उत्स्फूर्त दाद दिली.'वो कान्हा तेरी बासुरी' या गीतातून भगवान श्रीकृष्णाच्या बासरीचा सुरेल भावविश्व प्रेक्षकांसमोर उभे राहिले. 'ब्रज रस', 'अरे द्वारपालो', 'रामा रामा रटते रटते' आणि 'अवध में राम आए हैं' या गीतांनी रामभक्तीचा उत्कट आविष्कार घडविला. या सादरीकरणांदरम्यान अनेक रसिक मंत्रमुग्ध झाले, तर भक्तिगीतांच्या तालावर सभागृहात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.'ऐसा डमरू बजाया भोलेनाथ ने' आणि 'नमो नमो जी शंकरा' या गीतांच्या सादरीकरणातून भगवान शंकराला संगीतमय वंदन करण्यात आले. त्यानंतर 'कीजो केसरी के लाल', 'श्रीराम जानकी', 'बघ उघडुनी दार' आणि 'हरी म्हणा तुम्ही' या गीतांनी कार्यक्रमात अधिक रंगत आणली.

समर्थभक्त मंदारबुवा रामदासी,आमदार संग्राम जगताप, उपमहापौर धनंजय जाधव,महावीर ग्रुपच्या विजयाताई भंडारी,चंदूकाका सराफचे गणेश निकम, साईदीप हिरोचे सुधीर चोपडा,नगरसेविका पुष्पाताई बोरुडे,विचार भारतीचे राजाभाऊ मुळे, सुधीर लांडगे, भाजपचे जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, ऍडलॅबचे अविनाश शिरापुरी,अनाहतचे प्रसाद सुवर्णपाठकी, प्रसाद बेडेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत दिपप्रज्वलन करण्यात आले.

दिवाळी निमित्त बन्सीमहाराज मिठाईवाले यांच्याकडून पोलिसांना मिठाईची भेट !

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



अहिल्यानगर : दिवाळीच्या काळात कायदा-सुव्यवस्थेच्या स्थितीवर बारकाईने लक्ष ठेवण्यात व्यस्त असलेल्या पोलिसांचे तोंड येथील बन्सीमहाराज मिठाईवाले फर्मने गोड केले.तोफखाना पोलिस ठाण्यात जाऊन या फर्मचे संचालक गोविंद जोशी यांनी पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांना मिठाई दिली. पोलिसांविषयी दाखवलेल्या या आपुलकीबद्दल वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.यावेळी पोलीस निरीक्षक बालाजी तांबे, संजय जोशी ,कौशल जोशी, होमगार्ड व सर्व पोलीस उपस्थित होते

नगरच्या बन्सीमहाराज मिठाईवाले फर्मचा १०५ वर्ष होत आहे. यानिमित्ताने मागील काही वर्षांपासून त्यांच्याकडून दरवर्षी पोलिसांना दिवाळीत मिठाई भेट दिली जाते.'व्यवसाय करणे हा एक भाग झाला, पण आपल्या आनंदात समाजसेवेसाठी रात्रंदिवस काम करणारांची आठवण ठेवणे,हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे, व ती सामाजिक भावना आहे.या हेतूने पोलिसांना मिठाई दिली जात असल्याचे गोविंद जोशी यांनी सांगितले.

या वेळी बालाजी तांबे यांनी भेटीबद्दल आनंद व्यक्त केला.'मागील वर्ष पूर्ण बंदोबस्तात गेले, निवडणुका व इतर बंदोबस्त होता.पोलिसांची ड्युटी सतत ताणतणावाची असली तरी पोलिसांनी उत्कृष्ट कार्य केले.

पण सण-उत्सव प्रसंगीही आम्हाला सुट्टी मिळत नाही.मात्र, अशावेळी सण-आनंदाच्या क्षणी पोलिसांना मिठाई देऊन त्यांची आठवण समाज ठेवतो आहे, याचा विशेष आनंद आहे,' असे ते म्हणाले.

'अहिल्या दीपोत्सव'च्या माध्यमातून विचारांचा दीप उजळला; पद्मश्री पवार यांच्या हस्ते प्रकाशन!



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : दिवाळी अंकांच्या माध्यमातून साहित्य, विचार आणि सामाजिक प्रश्नांना व्यासपीठ मिळत असते. याच परंपरेला पुढे नेत वास्तव खबर डिजिटल मीडियाच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या पहिल्या 'अहिल्या दीपोत्सव' दिवाळी अंकाचे प्रकाशन शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणपती मंदिरात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. ज्येष्ठ समाजसेवक पद्मश्री पोपटराव पवार यांच्या हस्ते या दिवाळी अंकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी श्री विशाल गणपती मंदिराचे महंत संगमनाथजी महाराज, मंदिराचे विश्वस्त कैलास खरपुडे, दीपक पवार, वैष्णवी कदम, विधाते, नगरसेविका मंगल लोखंडे आदी मान्यवरांसह वास्तव खबर डिजिटल मीडियाचे प्रतिनिधी उपस्थित होते. वास्तव खबर डिजिटल मीडियाने 'अहिल्या दीपोत्सव' या पहिल्या दिवाळी अंकाची निर्मिती केली आहे.

हनी ट्रॅपच्या कथित कटकारस्थानाची उच्चस्तरीय चौकशी करा; मुस्लिम समाजाची पोलीस अधीक्षकांकडे मागणी

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



नगर तालुका : अहिल्यानगर जिल्ह्यात हनी ट्रॅपसारख्या कथित कटकारस्थानातून काही व्यक्तींना गुन्ह्यांमध्ये अडकवून मुस्लिम समाजाची बदनामी केली जात असल्याचा आरोप करत, या प्रकरणामागील संबंधित महिला आणि कथित मास्टरमाइंडचा शोध घेऊन सखोल चौकशी करावी व दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी अहिल्यानगर शहर व जिल्हा समस्त मुस्लिम समाजाच्या वतीने पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी मतीन सय्यद, अब्दुस सलाम, शौकत तांबोळी, अथर खान, नदीम शेख, अक्रम शेख, मुफ्ती इलियास शेख, कारी इमरान सय्यद, अन्वर सय्यद, शहा आफताब आदींसह मुस्लिम समाजाचे पदाधिकारी उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, श्रीरामपूर येथील एक महिला पुरुषांना संपर्काच्या माध्यमातून जवळीक निर्माण करून शारीरिक संबंधांचे आमिष दाखवते आणि त्यानंतर आर्थिक फसवणूक करण्याच्या उद्देशाने नियोजनपूर्वक गुन्हे दाखल करून आर्थिक तडजोडीसाठी दबाव आणत असल्याचा आरोप आहे. या महिलेच्या कार्यपद्धतीची सखोल चौकशी करण्याची आवश्यकता असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

निवेदनानुसार, १६ ऑक्टोबर २०२६ रोजी शिर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा क्र. ०८९४ दाखल झाला असून, या प्रकरणात मालेगाव येथील मुस्लिम समाजातील एका मौलानाला गोवण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच, राहुरी येथे १ नोव्हेंबर २०२६ रोजी गुन्हा क्र. १२१५/२०२६ दाखल झाल्याचेही निवेदनात म्हटले आहे. संबंधित घटनेच्या सुमारे १५ दिवस आधीपासून मोबाईलवर संपर्क साधून जवळीक निर्माण करण्यात आली आणि त्यानंतर नियोजनपूर्वक लॉजवर बोलावून संबंधित व्यक्तीला प्रकरणात अडकवण्यात आल्याचा दावा निवेदनकर्त्यांनी केला आहे.

दूध उत्पादकांची दिवाळी गोड

शेतकऱ्यांच्या कष्टांची जाणीव ठेवत निर्माण केला गोडवा!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



अहिल्यानगर : दुष्काळाचे सावट, वाढता आर्थिक ताण आणि शेती व्यवसायातील अडचणी अशा प्रतिकूल परिस्थितीतही शेतकरी आपल्या कष्टाच्या जोरावर दिवाळीचा सण साजरा करत आहेत. अशा परिस्थितीत दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याचा छोटासा प्रयत्न निमगाव वाघा (ता. नगर) येथील अंबादास दूध संकलन केंद्राच्या वतीने करण्यात आला. दिवाळीनिमित्त दूध उत्पादक शेतकऱ्यांना साखरेचे वाटप करून त्यांच्या सणाचा गोडवा वाढविण्यात आला.

जिल्हा परिषद पशुसंवर्धन विभागाच्या वतीने आदर्श गोपालक पुरस्कार प्राप्त पै. नाना डोंगरे यांच्या हस्ते दूध उत्पादक शेतकऱ्यांना साखर वाटप करण्यात आले. दिवाळीच्या सणानिमित्त शेतकऱ्यांच्या कष्टांची जाणीव ठेवून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

शेतीला जोडधंदा म्हणून अनेक शेतकरी दुग्धव्यवसाय करतात. जनावरांची देखभाल, चारा-पाण्याची व्यवस्था, पशुखाद्याचा वाढता खर्च आणि दुधाच्या दरातील चढ-उतार अशा अनेक आव्हानांना सामोरे जात दूध उत्पादक आपला व्यवसाय टिकवून आहेत. विशेषतः दुष्काळी परिस्थितीत जनावरांसाठी चारा व पाण्याची उपलब्धता करणे जिकिरीचे ठरत आहे. अशा काळात दूध संकलन केंद्राच्या माध्यमातून मिळालेली साखरेची भेट शेतकऱ्यांसाठी आनंददायी ठरली.

दूध उत्पादक शेतकरी हे दूध संकलन केंद्राचे महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत. त्यांच्या सहकार्यामुळेच दुग्धव्यवसायाची साखळी मजबूत राहते. त्यामुळे सण-उत्सवांच्या माध्यमातून शेतकऱ्यांशी जिव्हाळ्याचे नाते जपणे आणि त्यांच्या आनंदात सहभागी होणे महत्त्वाचे आहे. अंबादास दूध संकलन केंद्राच्या या उपक्रमातून सामाजिक बांधिलकी आणि शेतकऱ्यांविषयीची कृतज्ञता अधोरेखित झाली.

यावेळी दूध डेअरीचे चेअरमन भाऊसाहेब जाधव, बापू सुंबे, पोपट भगत, रमेश कुलट, राजू डोंगरे, बाळू जाधव, उत्तम निमसे, नवनाथ जाधव, भागचंद जाधव, बापू पुंड, हुसेन शेख, बाबूभाई शेख, अजय फलके, संदीप डोंगरे, किरण ठाणगे, राजू शिंदे, भाऊ होळकर आदींसह दूध उत्पादक शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित होते.

दिल्लीगेट येथे उच्च न्यायालयाच्या निर्णयाची प्रत गुढीसोबत उभारणार

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

अहिल्यानगर : प्रत्येक पात्र मतदार हा 'आम्ही भारताचे लोक' या घटनात्मक संकल्पनेचा भाग आहे. पत्ता बदलला किंवा संगणकीय व्यवस्थेत अडचण आली म्हणून त्याला प्रतिनिधी निवडण्याच्या प्रक्रियेबाहेर ठेवता येणार नाही, अशी भूमिका पीपल्स हेल्पलाईन आणि भारतीय जनसंसदेने मांडली आहे. पत्ता बदललेल्या विद्यमान मतदारांना मदत करण्यासाठी दोन्ही संघटना फॉर्म ८ वितरण आणि अर्जसहाय्य मोहीम राबवणार असल्याची माहिती ड. कारभारी गवळी यांनी दिली. तर निवडणूक प्रशासनातील कथित मनमानीच्या निषेधार्थ अहिल्यानगरच्या दिल्लीगेट येथे उच्च न्यायालयाच्या निर्णयाची प्रत गुढीसोबत उभारण्याचे जाहीर केले आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने परेश साळगावकर व इतर विरुद्ध गोवा राज्य व इतर, रिट याचिका क्र. ७३२/२०२६; तटस्थ संदर्भ २०२६:इकउ-ऋज-:२३६६-उह, या प्रकरणात ५ नोव्हेंबर २०२६ रोजी निर्णय दिला. न्यायमूर्ती वाल्मिकी मिनेझिस आणि न्यायमूर्ती अमित एस. जामसांडेकर यांच्या खंडपीठाने संबंधित सहा याचिकाकर्त्यांच्या निवासाची खात्री करून त्यांची नावे सांताक्रूझ मतदारसंघाच्या संबंधित यादीत दहा दिवसांत समाविष्ट करण्याचा आदेश दिला.

विशेष सखोल पुनरीक्षण अर्थात डखठ सुरू असतानाही लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० मधील कलम २२ आणि मतदार नोंदणी नियम, १९६० मधील नियम १३ स्थगित होत नाहीत. प्राप्त फॉर्म ८वर निर्णय घेणे मतदार नोंदणी अधिकाऱ्यांना बंधनकारक आहे, असे न्यायालयाने स्पष्ट केले. पत्ता बदलण्यासाठी फॉर्म ८ दिलेल्या संबंधित मतदारांना सुनावणी न देता यादीबाहेर ठेवण्यावरही न्यायालयाने आक्षेप घेतला.

या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर मुख्य निवडणूक आयुक्तांच्या नेतृत्वाखालील कारभारावर संघटनांनी टीका केली आहे.

दखल

वाळीत बारामतीकरांची पाण्याची चिंता मिटली

बारामती : दिवाळीच्या सणात बारामतीकरांसाठी आनंदाची आणि दिलासादायक बातमी आहे. शहराचा पाणीपुरवठा प्रामुख्याने निरा डाव्या कालव्यावर अवलंबून असल्याने कालव्याचे आवर्तन बंद असताना नागरिकांना नाईलाजाने एक दिवसाआड पाणीपुरवठा केला जात होता. कालव्याचे पुढील नियोजित आवर्तन १० नोव्हेंबर २०२६ रोजी सुरू होणार होते. मात्र, दिवाळीच्या सणात नागरिकांची पाण्यासाठी कोणतीही गैरसोय होऊ नये आणि प्रत्येक कुटुंबाला सण आनंदात साजरा करता यावा, यासाठी बारामती नगरपरिषदेने तातडीने पाठपुरावा केला.

नगराध्यक्ष सचिन सातव, पाणीपुरवठा सभापती मनीषा चव्हाण आणि मुख्याधिकारी पंकज भुसे यांनी महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, खासदार पार्थ पवार आणि युवा नेते जय पवार यांच्याकडे विशेष विनंती करून निरा डाव्या कालव्याचे आवर्तन नियोजित वेळेपूर्वी सुरू करण्यासाठी तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली.

बारामतीकरांच्या या मागणीची तातडीने दखल घेत उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, खासदार पार्थ पवार आणि युवा नेते जय पवार यांनी संबंधित विभागाला त्वरित निर्देश दिले. त्यामुळे १० नोव्हेंबरची वाट न पाहता निरा डाव्या कालव्याचे आवर्तन सुरू करण्यात आले आहे.बारामती शहराच्या विकासासोबतच शहरातील प्रत्येक नागरिकाच्या दैनंदिन गरजांकडे उपमुख्यमंत्री सुनेत्रावहिनी पवार यांचे कायम विशेष लक्ष असते. शहरातील कोणताही प्रश्न असो, नागरिकांच्या अडचणींची माहिती मिळताच त्या तत्परतेने दखल घेऊन संबंधित यंत्रणेला आवश्यक सूचना देतात. यावेळीही दिवाळीच्या काळात पाण्याची गैरसोय होऊ नये, यासाठी त्यांनी दाखवलेली तत्परता बारामतीकरांसाठी दिलासादायक ठरली आहे.



श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचा 'एक हात मदतीचा' उपक्रम; ५१ हजारांच्या धान्य किटचे वाटप

आळंदी : दिवाळीच्या आनंदोत्सवात मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त बांधवांची दिवाळी गोड करण्यासाठी श्री ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेच्या विद्यार्थी सहाय्यक समितीने पुढाकार घेतला. संस्थेच्या 'एक हात मदतीचा' या उपक्रमातून ५१ हजार रुपये किमतीच्या धान्य किटचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांसह शिक्षक, पालक आणि कर्मचाऱ्यांनी सामाजिक बांधिलकी जपत या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. श्री ज्ञानेश्वर बालक मंदिर, श्री ज्ञानेश्वर प्राथमिक विद्या मंदिर तसेच श्री ज्ञानेश्वर विद्यालय व ज्युनिअर कॉलेजमधील पदाधिकारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थ्यांनी यासाठी यथाशक्ती आर्थिक मदत केली. दिवाळीच्या सणात गरजू कुटुंबांनाही आनंदाचा प्रकाश मिळावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमासाठी संस्थेचे सचिव अजित वडगावकर, प्राचार्य किसन राठोड, उपप्राचार्य प्रशांत सोनवणे, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक प्रदीप काळे, पर्यवेक्षिका अनिता पडळकर, हेमांगी उपरे, अनुजायीनी राजहंस, विठ्ठलदास गुट्टे, प्रज्ञा यादव, सूर्यकांत खुडे, उज्ज्वला कडलासकर, विद्या वाघुले आणि सोनाली कातोरे यांनी विशेष सहकार्य केले.

मराठवाड्यातील दुष्काळग्रस्तांपर्यंत मदत पोहोचविण्यासाठी किसन राठोड, राजाभाऊ पानगावकर, इम्रान शेख, अयोध्या मुंढे आणि एस. व्ही. जाधव यांनी योगदान दिले. संस्थेच्या वतीने सर्व मदतकर्त्यांचे आभार मानण्यात आले.

कार्तिकी यात्रेसाठी प्रशासन सज्ज; जिल्हाधिकाऱ्यांकडून तयारीचा आढावा



आळंदी देवाची : संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या संजीवन समाधी सोहळ्यानिमित्त १ ते ६ डिसेंबरदरम्यान होणाऱ्या कार्तिकी एकादशी यात्रेच्या पूर्वतयारीसाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पुणे येथे उच्चस्तरीय आढावा बैठक घेण्यात आली. यात्रेसाठी देशभरातून लाखो वारकरी आणि भाविक आळंदीत दाखल होणार असल्याने सर्व शासकीय विभागांनी समन्वयाने नियोजन करून कामे निर्धारित वेळेत पूर्ण करावीत, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले.बैठकीस आळंदी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, मुख्याधिकारी माधव खांडेकर, डी. डी. भोसले-पाटील, देवस्थान कमिटीचे विश्वस्त चैतन्य महाराज कबीरबुवा, संजय घुंडरे पाटील तसेच पोलीस, आरोग्य, महावितरण, सार्वजनिक बांधकाम आणि जलसंपदा विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.यात्राकाळात अखंडित वीजपुरवठ्यासाठी स्वतंत्र फिडर व्यवस्था, तसेच मुख्य पाच दिवसांसाठी अतिरिक्त १० एमएलडी पाणी उपलब्ध करण्याचे नियोजन करण्यात आले. आरोग्य सुविधांसाठी तात्पुरती रुग्णालये, ऑक्सिजन बेड आणि दहा अतिरिक्त फिरते वैद्यकीय बूथ कार्यान्वित करण्याच्या सूचना देण्यात आल्या. अन्न व औषध प्रशासनाने खाद्यपदार्थांच्या दुकानांची विशेष तपासणी करण्याचेही निर्देश दिले.

सर्व विभागांना कामांचे उद्दिष्ट वाटप

जलसंधारण, पाणी पुनर्भरण आणि रोजगारनिर्मितीच्या कामांना प्राधान्य

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी घेतला व्ही. बी. जी. राम जी. अंतर्गत कामांचा आढावा

प्रतिनिधी, राष्ट्र सह्याद्री

पुणे : संभाव्य दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी तसेच ग्रामीण भागात जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणावर हाती घेऊन पाणीटंचाईवर मात करण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी व्ही. बी. जी. राम जी. अंतर्गत प्रस्तावित कामांचा आढावा घेतला. या आढाव्यादरम्यान जिल्ह्यातील विविध शासकीय विभागांना कामांचे उद्दिष्ट निश्चित करून देण्यात आले असून, प्रत्येक ग्रामपंचायत स्तरावर आवश्यक कामांचे नियोजन करण्यावर भर देण्यात आला आहे.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर गावपातळीवर पाणी उपलब्धता वाढविणे, पावसाचे पाणी अडविणे व जमिनीत जिरविणे, भूजल पातळीत वाढ करणे, जलस्रोतांचे पुनरुज्जीवन करणे आणि ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी निर्माण करणे, या उद्देशाने विविध प्रकारची कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत.

जिल्ह्यातील १,४०५ ग्रामपंचायतींचा विचार करून विविध विभागांना कामांचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. यामध्ये ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद लघुपाटबंधारे विभाग, कृषी विभाग, बांधकाम विभाग, मृद व जलसंधारण विभाग, वन विभाग आणि सामाजिक वनीकरण विभागांचा समावेश आहे.

जलसंधारणाच्या कामांना विशेष प्राधान्य

ग्रामपंचायत स्तरावर शोषखड्डे, विहीर पुनर्भरण, नाला सरळीकरण व खोलीकरण, जलतारा, रेन वॉटर हार्वेस्टिंग, पाणंद रस्ते तसेच मातोश्री पाणंद रस्त्यांची कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत. याशिवाय कंपार्टमेंट बंडिंग, गॅबियन स्ट्रक्चर, नाला बंडिंग, मातीनाला बांध, नाडेप आणि गांडूळ खत प्रकल्प यांसारख्या कामांचाही समावेश करण्यात आला आहे.

शोषखड्डे आणि विहीर पुनर्भरण, नाडेप व गांडूळ खत प्रकल्पांसाठी प्रत्येकी १४ हजार ५० कामांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. तसेच रेन वॉटर हार्वेस्टिंगसाठी ४ हजार २१५ कामे आणि पाणंद रस्त्यांसाठी १ हजार ४०५ कामांचे नियोजन करण्यात आले आहे.

मृद व जलसंधारण विभागाची महत्त्वाची भूमिका

मृद व जलसंधारण विभागामार्फत पाझर तलावांमधील गाळ काढणे व तलावांची दुरुस्ती, नाला सरळीकरण व खोलीकरण, दगडी बांध (ब्रश्रश्रू झश्रीस), कंपार्टमेंट बंडिंग, गॅबियन स्ट्रक्चर, नाला बंडिंग तसेच माती नाला बांध ही कामे करण्यात येणार आहेत.

दगडी बांध, कंपार्टमेंट बंडिंग, गॅबियन स्ट्रक्चर, नाला बंडिंग आणि माती नाला बांध या प्रत्येक कामासाठी १,४०५ ग्रामपंचायतींच्या प्रमाणात प्रत्येकी दोन कामे, असे एकूण २ हजार ८१० कामांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

पाझर तलावांमधील गाळ काढणे आणि त्यांची दुरुस्ती केल्यामुळे पाणीसाठवण क्षमता वाढण्यास मदत होणार आहे. तसेच उपलब्ध बंधाऱ्यांच्या ठिकाणी नाल्यांचे सरळीकरण व खोलीकरण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

सामाजिक वनीकरण विभागामार्फत वैयक्तिक वृक्षलागवडीसाठी प्रत्येक ग्रामपंचायतीत दोन कामे, या प्रमाणात एकूण २ हजार ८१० कामांचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. रोपवाटिका उभारणीदेखील पाण्याच्या उपलब्धतेनुसार करण्यात येणार आहे.

पाणंद रस्ते व सार्वजनिक बांधकामांवर भर

सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत पाणंद रस्ते व मातोश्री पाणंद रस्त्यांची कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत. यासाठी १,४०५ कामांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. शासनाकडून मंजूर झालेली सर्व कामे शेल्फवर ठेवण्याबाबतही नियोजन करण्यात आले आहे.

गावनिहाय नियोजन आणि प्रभावी अंमलबजावणी

जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये स्थानिक परिस्थिती, पाण्याची उपलब्धता, नैसर्गिक जलप्रवाह आणि आवश्यकतेनुसार कामांची निवड करण्यावर भर देण्यात आला आहे.

विविध विभागांमध्ये समन्वय ठेवून प्रस्तावित कामांचे नियोजन आणि अंमलबजावणी केल्यास जलसंधारणाला चालना मिळण्याबरोबरच ग्रामीण भागातील पाणीटंचाई कमी करण्यास मदत होणार आहे.

संभाव्य दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन जिल्हाधिकारी डुडी यांनी विविध विभागांना उद्दिष्टे निश्चित करून दिल्याने जिल्ह्यात जलसंधारण, जलस्रोत पुनरुज्जीवन, वृक्षलागवड, मृदसंधारण आणि ग्रामीण पायाभूत सुविधांच्या कामांना गती मिळणार आहे. या कामांच्या माध्यमातून गावागावांत पाणी अडविणे, पाणी जिरविणे आणि उपलब्ध नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

कष्टकऱ्यांच्या उंबरठ्यावर 'सानिध्य'चा दीपोत्सव

फराळ बनवणाऱ्या बेलसरच्या भगिनींना मिळाला कमाईचा मार्ग

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

सासवड : दिवाळी म्हणजे प्रकाशाचा सण; पण ज्यांच्या शेतात यंदा एक दाणाही उगवला नाही, त्यांच्या घरात हा प्रकाश कसा पोहोचणार? हाच प्रश्न मनाशी धरून सुरू झालेल्या सानिध्य फाऊंडेशनने आपल्या पहिल्याच सामाजिक कार्यात ५० दुष्काळग्रस्त कुटुंबांच्या घरी सणाचा उजेड नेला. त्याचवेळी बेलसरच्या मीरा बचत गटाला फराळनिर्मितीचे काम देत ग्रामीण महिलांच्या आर्थिक प्रगतीलाही हातभार लावला.

'एक दिवा जगाच्या पोशिंद्यासाठी' या शीर्षकाखाली राबवलेल्या या मोहिमेचा शेवटचा टप्पा १ नोव्हेंबर २०२६ रोजी मोहोळ येथे पार पडला. पावसाअभावी संकटात सापडलेले शेतकरी, शेतमजूर आणि ऊसतोडणी करणाऱ्या कुटुंबांना या दिवशी फराळ, उटणे व दिव्यांची भेट देण्यात आली. घरातील मुलाबाळांसाठी आलेला फराळ पाहून अनेक मातांच्या चेहऱ्यावर समाधान उमटले.

या मोहिमेचा कणा ठरल्या त्या बेलसरच्या मीरा बचत गटातील महिला. गेल्या नऊ वर्षांपासून फराळ तयार करणाऱ्या या भगिनींनी प्रथमच ५० संचांचे मोठे काम हाती घेतले आणि ते यशस्वीपणे पूर्ण केले. त्यांच्या मेहनतीचे मोल म्हणून फाऊंडेशनने त्यांना २७,५०० रुपयांचा धनादेश दिला. सणासुदीच्या दिवसांत हाती आलेल्या या उत्पन्नामुळे गटातील महिलांच्या कुटुंबांनाही आर्थिक दिलासा मिळाला आहे. या कार्यात राज्यभरातील स्वयंसेवक खांद्याला खांदा लावून उभे राहिले. पुणे, मुंबई आणि सोलापूरसह विविध ठिकाणी मदत जमा करण्याची व्यवस्था करण्यात आली होती. अनेक संवेदनशील नागरिकांनी पुढे येऊन दिलेल्या योगदानामुळे पहिलाच उपक्रम दिमाखात यशस्वी झाला.



दुष्काळग्रस्त कुटुंबांना दिवाळी फराळ व दिव्यांची भेट देताना सानिध्य फाऊंडेशनच्या संस्थापिका सौ. प्रतिमा प्रकाश जगताप, मीरा बचत गटाच्या महिला व स्वयंसेवक.

गावागावांत गुणवत्ता आहे, कष्ट करण्याची तयारी आहे. गरज आहे ती त्या गुणवत्तेला संधीची जोड देण्याची. सानिध्य फाऊंडेशन हा दुवा बनून सदैव लोकांच्या सोबत राहील. – सौ. प्रतिमा प्रकाश जगताप, संस्थापिका, सानिध्य फाऊंडेशन

महिलांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी रोजगाराच्या नव्या संधी, प्रशिक्षण आणि बाजारपेठेशी जोडणी, तसेच युवकांना योग्य करिअर निवडीसाठी मार्गदर्शन, व्यवसाय आणि नोकरीविषयक उपक्रम सातत्याने राबवण्याचा निर्धार फाऊंडेशनने व्यक्त केला आहे.

पुरंदरच्या कुशीतील गुरोळी जिल्ह्याच्या शिखरावर!

अत्युत्कृष्ट ग्रामपंचायत पुरस्कारात प्रथम, ५० लाखांचे बक्षीस

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

सासवड : पुरंदर तालुक्याच्या कुशीत वसलेले गुरोळी हे गाव आता संपूर्ण पुणे जिल्ह्यासाठी विकासाचा मापदंड ठरले आहे. राज्य सरकारच्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात (२०२५-२६) गुरोळी ग्रामपंचायतीने जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक प्राप्त केला असून, अत्युत्कृष्ट ग्रामपंचायत पुरस्कारासह गावाला ५० लाख रुपयांचे बक्षीस मंजूर झाले आहे. ग्रामविकास विभागाने ६ नोव्हेंबर २०२६ रोजी याबाबत शासन निर्णय (क्रमांक मुसपंअ-२०२६/प्र.क्र.४३८) जाहीर केला. या घोषणेनंतर गुरोळीत समाधान आणि अभिमानाचे वातावरण आहे.

हे यश म्हणजे गावकऱ्यांनी एकमेकांच्या साथीने केलेल्या परिश्रमांचे फलित आहे. गावाच्या प्रत्येक कोपऱ्यात लोकसहभागाची छाप दिसते. यात महिलांचे योगदान विशेष उल्लेखनीय ठरले. स्वच्छतेचे काम, सामाजिक उपक्रमांचे आयोजन, गावात जागृती घडवणे आणि विकासकामांत सक्रिय राहणे, या सर्वांत गावातील भगिनींनी आघाडीची भूमिका निभावली. गावातील तरुण मंडळींनीही उपक्रम यशस्वी करण्यासाठी कसून मेहनत घेतली. ज्येष्ठांच्या अनुभवाचा आधार आणि मुलांचा निरागस उत्साह यांमुळे संपूर्ण गाव एकसंध झाले.

या अभियानात गावाच्या प्रगतीचा प्रत्येक पैलू तपासण्यात आला. परिसराची स्वच्छता, पर्यावरणाची निगा, ग्रामस्थांचा सहभाग, महिलांच्या सक्षमीकरणासाठीचे प्रयत्न, सरकारी योजनांचा प्रत्यक्ष लाभ आणि नागरिकांप्रति उत्तरदायी प्रशासन, हे मूल्यमापनाचे महत्त्वाचे निकष होते. केवळ एखाद्या क्षेत्रात चमकदार काम करून येथे यश मिळणार नव्हते, तर सर्वच पातळ्यांवर ठोस काम दाखवावे लागणार होते. गुरोळीने हे साध्य करून दाखवले.

गावाच्या प्रगतीत आपला वाटा उचलला. स्पर्धेमुळे गावात घडलेला सकारात्मक बदल हीच खरी मिळकत आहे. ती पुढेही कायम राहावी, यासाठी आपण सर्वांनी मिळून प्रयत्न करायला हवेत.

– प्रशांत खेडेकर, उपजिल्हाधिकारी

गुरोळीचा प्रथम क्रमांक ही पुणे जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब आहे. लोकप्रतिनिधी, ग्रामपंचायत पदाधिकारी, प्रशासन आणि ग्रामस्थ यांनी एकत्र येऊन काम केल्यास विकास कसा साधता येतो, हे या गावाने दाखवून दिले. या पुरस्कारामुळे गावाला पुढील कामांसाठी नवे बळ मिळेल. ग्रामीण विकासासाठी आमचे प्रयत्न अविरत सुरू राहतील. गुरोळी ग्रामपंचायतीचे अभिनंदन!

– वीरधवल जगदाळे, अध्यक्ष, जिल्हा परिषद, पुणे

गुरोळीने नियोजनबद्ध काम, प्रशासकीय ताळमेळ आणि ग्रामस्थांच्या सहभागातून हे यश मिळवले आहे. सरपंच, पदाधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी, कर्मचारी आणि सर्व ग्रामस्थ अभिनंदनास पात्र आहेत. पुरस्कारातून मिळणारे प्रोत्साहन गावाच्या विकासकामांना अधिक गती देईल, असा विश्वास आहे.

– गजानन पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे

महिला शासकीय अधिकाऱ्यांच्या साहित्यिक अभिव्यक्तीला 'सौदामिनी'तून व्यासपीठ

देशातील पहिला अभिनव उपक्रम; महिलांना प्रत्येक क्षेत्रात कर्तृत्व सिद्ध करावे लागते : राज्यमंत्री माधुरी मिसाळ

प्रतिनिधी, राष्ट्र सह्याद्री

पुणे : महिलांना नेतृत्वाच्या संधी सहज मिळत नाहीत. संधी मिळाली तरी प्रत्येक वेळी आपले कर्तृत्व आणि क्षमता सिद्ध करावी लागते. स्वतःची वेगळी ओळख निर्माण करण्यासाठी महिलांना अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो, असे प्रतिपादन राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी केले.

सरहद संस्थेच्या वतीने महिला शासकीय अधिकाऱ्यांसाठी प्रकाशित करण्यात आलेल्या 'सौदामिनी' या विशेष दिवाळी अंकाचे प्रकाशन आज राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांच्या हस्ते पुणे येथे झाले. त्यावेळी त्या बोलत होत्या.

महिला नेतृत्वाच्या उदाहरणांचा उल्लेख करताना मिसाळ यांनी भारतीय लष्करातील लेफ्टनंट जनरल डॉ. माधुरी कानिटकर यांच्या कार्याचा विशेष गौरव केला. विविध क्षेत्रांत महिलांनी आपल्या कर्तृत्वाच्या बळावर नेतृत्वाची शिखरे गाठली आहेत. अशा महिलांचे अनुभव, विचार आणि साहित्यिक अभिव्यक्तीला 'सौदामिनी'च्या माध्यमातून व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा सरहद संस्थेचा प्रयत्न महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी सांगितले. महिला शासकीय अधिकाऱ्यांच्या साहित्यिक अभिरुचीला प्रोत्साहन देणे, प्रशासकीय जबाबदाऱ्या सांभाळतानाच त्यांच्यातील लेखिका, कवयित्री आणि संवेदनशील व्यक्तिमत्त्वाला अभिव्यक्तीची संधी उपलब्ध करून देणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. देशात प्रथमच महिला शासकीय अधिकाऱ्यांसाठी अशा स्वरूपाचा विशेष दिवाळी अंक प्रकाशित करण्यात आला आहे.

या अंकामध्ये प्रशासनातील महिलांचे अनुभव, सामाजिक प्रश्नांकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन, साहित्यिक लेखन, स्त्रीजीवनाचे विविध पैलू आणि वैचारिक मांडणी यांचा समावेश करण्यात आला आहे. महिला अधिकारी म्हणून प्रशासकीय कार्यासोबतच त्यांच्यातील साहित्यिक प्रतिभा, स्वतंत्र विचारशक्ती आणि सामाजिक जाणिवांचा परिचय समाजाला व्हावा, हा या उपक्रमामागील व्यापक हेतू आहे.

या विशेषांकाच्या संपादकपदाची जबाबदारी निवृत्त माहिती संचालक श्रद्धा बेलसरे-खारकर यांनी सांभाळली असून, सहसंपादक म्हणून सरहदचे समन्वयक लेशपाल जवळगे यांनी काम पाहिले आहे.यावेळी सरहद संस्थेचे संस्थापक संजय नहार, विश्वस्त शैलेश वाडेकर, समन्वयक डॉ. शैलेश पगारिया, डॉ. संगीता शिंदे, कविता वानखेडे, मनीषा वाडेकर, गीता खोत आणि मयूर मसुरकर यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांना १० लाख २५ हजार रुपयांच्या आर्थिक मदतीचे वितरण

प्रतिनिधी, राष्ट्र सह्याद्री

पुणे : जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, पुणे यांच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांतर्गत माजी सैनिक, माजी सैनिकांच्या विधवा तसेच त्यांच्या पाल्यांना एकूण १० लाख २५ हजार रुपयांच्या आर्थिक मदतीचे वितरण जिल्हाधिकारी तथा जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाचे अध्यक्ष जितेंद्र डूडी यांच्या हस्ते ५ नोव्हेंबर रोजी करण्यात आले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील दालनात आयोजित कार्यक्रमात १० लाभार्थ्यांना धनादेशाद्वारे आर्थिक मदत प्रदान करण्यात आली. यामध्ये माजी सैनिकांना स्वयंरोजगारासाठी ३ लाख रुपये, सैन्यसेवेत असताना ४६.०४ टक्के अपंगत्व आलेल्या सैनिकास २५ हजार रुपये, सदनिका खरेदीसाठी पाच लाभार्थ्यांना एकूण ४ लाख ५० हजार रुपये, अधिकारी शिक्षण घेत असलेल्या पाल्याच्या माजी सैनिक पालकास १ लाख रुपये, परदेशात शिक्षण घेणाऱ्या पाल्याच्या माजी सैनिक पालकास १ लाख रुपये, तर सैनिकी शाळेत शिक्षण घेणाऱ्या पाल्याच्या माजी सैनिक पालकास ५० हजार रुपये अशी मदत देण्यात आली. या कार्यक्रमास जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी तसेच जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सशस्त्र सेना ध्वजदिन निधीतून या कल्याणकारी योजना राबविण्यात येतात.

जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांच्या हस्ते १० लाभार्थ्यांना धनादेश प्रदान

'निवडणूक संपते, मैत्री नाही!' : विजय कोलते यांचा राजकारण्यांना कानमंत्र

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

सासवड : आज जो विरोधक आहे, तो उद्या सहकारी असू शकतो. राजकारणात कायमचे मित्र किंवा कायमचे शत्रू नसतात. त्यामुळे निवडणुकीच्या गणितापलीकडे जाऊन माणसे जोडण्याची कला राजकीय कार्यकर्त्याने अंगी बाणवली पाहिजे, असा मोलाचा कानमंत्र पुणे जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष विजय कोलते यांनी दिला. तरुणांना सोबत घेऊन दूरदृष्टीने राजकारण करण्याचा वस्तुपाठ माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी घालून दिला, तोच आदर्श आपल्या वाटचालीचा पाया असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. कोलते यांनी वयाची ७१ वर्षे पूर्ण केल्याच्या निमित्ताने आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठान, पुरंदर यांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते.माजी आमदार अशोकराव टेकवडे यांनी कोलते यांच्या मार्गदर्शनाचे ऋण व्यक्त करताना, त्यांच्या तालमीत तयार झालेले आमच्यासारखे कार्यकर्ते आमदारकीपर्यंत मजल मारू शकले, याचा मनस्वी अभिमान वाटतो, अशी भावना व्यक्त केली.



माजी मंत्री व पुरंदरचे आमदार विजय (बापू) शिवतारे यांच्या वतीने बोलताना पुरंदरचे माजी सभापती अतुल म्हस्के यांनी दोन्ही नेत्यांच्या स्नेहबंधाचा विशेष उल्लेख केला. विजय कोलते आणि विजय शिवतारे या दोन 'विजयां'नी एकमेकांशी असलेली मैत्री जपली असून हाच आमच्यासाठी आदर्श आहे, असे ते म्हणाले. प्रतिष्ठानचे सचिव शांताराम पोमण यांनी प्रास्ताविक केले. ॲड. प्रकाश खाडे, शामकांत भिंताडे, ॲड. दिलीप निरगुडे, प्राचार्य इस्माईल सय्यद, प्राचार्य डॉ. सुभाष तळेकर यांनी मनोगतातून कोलते यांच्या कार्याचा गौरव करत शुभेच्छा दिल्या.

सोहळ्याला माजी उपसभापती लक्ष्मणदादा चव्हाण, नंदूकाका जगताप, माजी नगराध्यक्ष हेमंत भोंगळे, ॲड. कला फडतरे, विठ्ठल जगताप, बाजार समितीचे संचालक वामन कामठे, नगरसेवक सचिन भोंडे, बाळासाहेब भिंताडे, शिवराम शेंडकर, अरुण कांचन, बबन कोलते यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन सचिन घोलप यांनी केले, तर प्रतिष्ठानचे सहसचिव बंडूकाका जगताप यांनी आभार मानले.

वृद्धाश्रमांची वाढती संख्या चिंतेची बाब

गरजूंना मदतीसोबत रोजगाराच्या संधीही उपलब्ध करून द्या : पो. नि. मुटेकर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



शेवगाव : बदलत्या सामाजिक परिस्थितीत वृद्धाश्रमांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. ही बाब समाजासाठी आनंदाची नसून आत्मपरीक्षण करण्याची व चिंता करण्याची बाब आहे. ज्या आई-वडिलांनी आपल्या मुलांचे संगोपन करून त्यांना घडविण्यासाठी आयुष्य खर्ची घातले, त्याच ज्येष्ठ नागरिकांना वृद्धाश्रमात राहण्याची वेळ येणे ही सामाजिक वास्तवाची वेदनादायी बाजू आहे. अशा परिस्थितीत वृद्धाश्रमांतील ज्येष्ठ नागरिकांचा सांभाळ करून त्यांना प्रेम, आधार आणि सन्मान देण्याचे काम सामाजिक संस्था करीत आहेत. त्याचबरोबर सणासुदीच्या काळात गरजू कुटुंबांना किराणा साहित्याची मदत करून त्यांच्या घरात आनंदाचे दिवे लावण्याचे आणि त्यांच्या आयुष्यात गोडवा निर्माण करण्याचे कार्य कौतुकास्पद आहे. मात्र, केवळ मदत करण्यापुरते मर्यादित न राहता गरजूंना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देऊन त्यांना स्वावलंबी बनविण्याची गरज आहे, असे प्रतिपादन सहाय्यक पोलीस निरीक्षक शंकर मुटेकर यांनी केले.

शेवगाव येथील श्री गुरुदत्त सामाजिक, शैक्षणिक, कला व क्रीडा संस्थेच्या वतीने दीपावलीनिमित्त योगतज्ञ दादाजी वैशंपायन वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांना नवीन वस्त्रदान, तसेच गोरगरीब व गरजू कुटुंबांना किराणा साहित्याचे वाटप करण्यात आले. सहाय्यक पोलीस निरीक्षक शंकर मुटेकर यांच्या हस्ते हा उपक्रम पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

या वेळी ॲड. अभिजित काकडे, माजी प्राचार्य श्रीधर मुरकुटे, संस्थेचे अध्यक्ष अर्जुनराव फडके, सचिव फुलचंद रोकडे, श्रीकांत गोरे, बाबुशेठ जोशी, नगरसेवक निलेश रोकडे, पी. बी. शिंदे आदी उपस्थित होते.

मुटेकर म्हणाले की, योगतज्ञ दादाजी वैशंपायन यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या या भूमीत श्री गुरुदत्त सामाजिक संस्थेचे कार्य विस्तारत आहे. सामाजिक बांधिलकी जपत संस्थेच्या माध्यमातून वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांना वस्त्रदान आणि गरजू कुटुंबांना किराणा साहित्याचे वाटप केले जात आहे. अशा उपक्रमांमुळे समाजातील वंचित घटकांना सणासुदीच्या काळात दिलासा मिळतो. अनेक कुटुंबांना आर्थिक अडचणींमुळे सण साजरा करताना अडचणी येतात. अशा वेळी सामाजिक संस्थांनी पुढाकार घेऊन केलेली मदत त्यांच्यासाठी मोठा आधार ठरते.

मात्र, गरिबी आणि बेरोजगारी या प्रश्नांवर कायमस्वरूपी उपाय करण्यासाठी संस्थांनी पुढाकार घेणे आवश्यक आहे. गरजूंना वारंवार मदत करण्यापेक्षा त्यांच्या हाताला काम देऊन त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे अधिक महत्त्वाचे आहे.

संस्थेच्या माध्यमातून बचत गटांची स्थापना करून महिलांना विविध व्यवसायांचे प्रशिक्षण व संधी उपलब्ध करून द्याव्यात. छोटे-मोठे व्यवसाय उभे करण्यासाठी प्रोत्साहन दिल्यास अनेक कुटुंबांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न मार्गी लागू शकतो.

ऐश्वर्या लोणकरचे टोकियोत आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र परिषदेत संशोधन सादरीकरण

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



श्रीगोंदा : ग्रामीण भागातील शाळेत शिक्षणाचे धडे गिरवत जागतिक पातळीवर आपल्या बुद्धिमत्तेचा ठसा उमटविण्याची किमया आढळगावच्या कन्येने साधली आहे. आढळगाव येथील पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयाची माजी विद्यार्थिनी कु. ऐश्वर्या विठ्ठल लोणकर हिने थेट जपानमधील टोकियो येथे आयोजित २५ व्या आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र परिषदेत आपल्या संशोधन पेपरचे यशस्वी सादरीकरण केले. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे श्रीगोंदा तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

जपान इकॉनॉमिक्स पॉलिसी असोसिएशनच्या वतीने आयोजित या प्रतिष्ठेच्या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी जगभरातून संशोधन प्रबंध सादर करण्यात आले होते. त्यातून ऐश्वर्या लोणकर हिच्या संशोधन पेपरची निवड होणे ही विशेष अभिमानाची बाब ठरली. टोकियो येथे जगातील नामवंत अर्थशास्त्रज्ञ आणि संशोधकांच्या उपस्थितीत तिने आपल्या संशोधनाचे प्रभावी सादरीकरण केले. तिच्या संशोधनातील आर्थिक धोरणे आणि आंतरराष्ट्रीय व्यापारविषयक विश्लेषणाची उपस्थित तज्ज्ञांनी विशेष दखल घेतली.

ऐश्वर्याने आपले प्राथमिक व माध्यमिक शिक्षण आढळगाव येथील पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयातून पूर्ण केले. त्यानंतर उच्च शिक्षणासाठी पुण्याची वाट धरत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून उच्च शिक्षणाचा पाया भक्कम केला. सध्या ती सिम्बायोसिस स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स येथे एम.एस्सी. अर्थशास्त्र (आंतरराष्ट्रीय व्यवसाय, व्यापार आणि कर कायदा) या अभ्यासक्रमाचे शिक्षण घेत आहे. याच शैक्षणिक प्रवासात तिने आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल घेतली जाईल असे संशोधन साकारले.

ग्रामीण भागातील सर्वसामान्य कुटुंबातून आलेल्या विद्यार्थिनीने जिद्द, मेहनत आणि गुणवत्तेच्या जोरावर आंतरराष्ट्रीय व्यासपीठ गाठले आहे. मोठ्या शहरांतील शैक्षणिक सुविधा किंवा परदेशातील शिक्षणाची पार्श्वभूमी नसतानाही ग्रामीण शाळेतील विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर स्वतःला सिद्ध करता येते, याचा वस्तुपाठ ऐश्वर्याने घालून दिला आहे.

या यशामागे तिचे आई-वडील, पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयातील शिक्षक तसेच सिम्बायोसिस संस्थेतील प्राध्यापकांचे मार्गदर्शन आणि प्रोत्साहन मोलाचे ठरले आहे.

द•ख•ल

उत्तर पुणे पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी संतोष वळसे पाटील यांची नियुक्ती

निघोज : उत्तर पुणे जिल्हा पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी आंबेगाव तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष वळसे पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष शिवराज काटकर यांनी पुणे उत्तर जिल्हा पत्रकार संघाची कार्यकारिणी जाहीर केली आहे. नव्या कार्यकारिणीत उत्तर पुणे जिल्ह्यातील विविध तालुक्यातील पत्रकारांना जबाबदार देण्यात आल्या आहेत. अध्यक्षांसह, उपाध्यक्ष, सरचिटणीस कोषाध्यक्ष आणि ईतर पदावर नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहेत. हनुमंत देवकर -उपाध्यक्ष चाकण, सचिन कांकरिया उपाध्यक्ष जुन्नर, दत्ता भालेराव - सरचिटणीस खेड, संजय बारहाते - कोषाध्यक्ष शिरुर, रवि पाटील - निवडणूक प्रमुख , संजय पाटील - कायदेशीर सल्लागार या सर्व निवडीचे पुणे जिल्ह्यात अभिनंदन होत आहे.



खा. नीलेश लंके यांनी घेतली बाळासाहेब थोरात यांची सदिच्छा भेट

निघोज : अहिल्यानगरचे खासदार नीलेश लंके यांनी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांची संगमनेर येथे सदिच्छा भेट घेतली. यावेळी खासदार लंके यांनी थोरात यांना दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. बाळासाहेब थोरात यांनीही खासदार लंके यांना दिवाळीच्या शुभेच्छा देत नुकत्याच झालेल्या अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीतील विजयाबद्दल त्यांचे अभिनंदन केले. या भेटीची राजकीय वर्तुळात चर्चा सुरू असून आगामी जिल्हा सहकारी बँकेच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष निवडणुकीत थोरात साहेब काय भुमिका घेतात याकडे जनतेचे लक्ष वेधले गेले आहे. खासदार लंके यांच्या लोकसभा निवडणुकीत माजी मंत्री थोरात यांची भुमिका निर्णायक राहिली असून लंके यांना खासदार करण्यामध्ये थोरात साहेब यांचे महत्वपूर्ण योगदान राहिले आहे. जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीत खासदार लंके नकोत ही भूमिका विखे गटाने घेतल्याने निवडणूक बिनविरोध झाली नाही अशी चर्चा सुरू होती. त्यानंतर लंके यांनी निवडणूक लढवून विक्रमी मताधिक्याने विजयी झाले. याचे शल्य विखे गटाला मोठ्या प्रमाणात आहे. शुक्रवार दि.६ रोजी नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी सभापती प्रा. राम शिंदे यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली यावरुनच जिल्हा सहकारी बँकेच्या निवडणुकीत काहीतरी वेगळाच निर्णय होईल काय याची चर्चा सुरू आहे.



ॲड.देवराम गोरडे यांची नवोदय विद्यालय व्यवस्थापन समितीवर निवड

टाकळी ढोकेश्वर : पारनेर येथील नामांकित वकील देवराम रंगनाथ गोरडे यांची जवाहर नवोदय विद्यालय व्यवस्थापन समितीच्या सदस्यपदी निवड झाली आहे. केंद्रशासन अंतर्गत असणाऱ्या जवाहर नवोदय विद्यालयाचे प्राचार्य एस जी मुन्नावर यांनी केंद्रीय समितीच्या आदेशानुसार व अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली व खा.निलेश लंके यांच्या शिफारशीनुसार पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील रहिवासी ऍड. देवराम गोरडे नवोदय विद्यालयात व्यवस्थापन समितीच्या सदस्यपदी निवड झालेबाबतचे नियुक्ती पत्र दिले आहे. ऍड.देवराम गोरडे हे नामांकित वकील असून त्यांनी गेल्या ३० वर्षात आपल्या वकिली अनुभवाच्या जोरावर अनेक सामाजिक व कामकाज केले असून व त्यांचे शैक्षणिक क्षेत्रात कायम मदत असल्याने त्यांना या पदावर नियुक्त केले असल्याचे नगर दक्षिणचे खासदार निलेश लंके यांनी आपल्या पत्रात व्यक्त केले आहे.सदर निवडीबाबत गोरडे यांचे उपसरपंच रामभाऊ तराळ,सुनील चव्हाण,शुभम निवडुंगे,अमोल आल्हाट,गणेश झावरे,गंगाधर बांडे व टाकळी ढोकेश्वर ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.



मिरजगाव ग्रामपंचायतीकडून कर्मचाऱ्यांना दिवाळी बोनस वाटप

मिरजगाव : कर्जत तालुक्यातील मिरजगाव ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना दिवाळीनिमित्त यंदा देखील सालाबादप्रमाणे एक महिन्याचा पगार व एक महिन्याचा बोनस नुकताच वाटप करण्यात आला आहे. यंदा दिवाळी सणादरम्यान पहिल्यांदाच गावचा कारभार करणारे गाव कारभारी नसल्याने राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थेवर प्रशासकराज आले असून गावचा कारभार सध्या प्रशासकाच्या हाती आला आहे. असे असताना ग्रामपंचायत अधिकारी विजयकुमार बनाते व प्रशासक दिलीप कराळे यांनी घेतलेल्या या निर्णयामुळे ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना दिवाळी बोनस वाटप करणारी मिरजगाव ग्रामपंचायत कर्जत तालुक्यातील पहिली ग्रामपंचायत ठरली आहे.

आता उसासाठी थेट ५० बॅगची खरेदी!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

श्रीगोंदा : शेतीत एखाद्या उत्पादनाची खरी गुणवत्ता जाहिरातीतून नव्हे, तर प्रत्यक्ष शेतातील परिणामातून सिद्ध होते! याचाच प्रत्यय काष्टी (ता. श्रीगोंदा) येथील प्रगतिशील युवा शेतकरी राजेंद्र तात्यासाहेब तांबे यांच्या अनुभवातून आला आहे. महिनाभरापूर्वी अवघ्या दहा बॅग 'भू चैतन्य' गांडूळ खताची चाचणी म्हणून खरेदी केली. घास आणि कांदा रोपांसाठी त्याचा वापर केला. मिळालेला प्रतिसाद समाधानकारक वाटल्याने आता त्यांनी ऊस पिकासाठी तब्बल ५० बॅग खताची खरेदी केली आहे. दहा बॅगपासून सुरू झालेला विश्वास थेट ५० बॅगपर्यंत!** हा बदल केवळ खरेदीच्या आकड्यापुरता मर्यादित नसून शेतकऱ्याच्या प्रत्यक्ष अनुभवातून निर्माण झालेल्या विश्वासाची कहाणी आहे. राजेंद्र तांबे यांनी पहिल्या टप्प्यात घेतलेल्या दहा बॅगांपैकी काही बॅग घास पिकासाठी, तर काही बॅग कांद्याच्या रोपांसाठी वापरल्या. दोन्ही ठिकाणी चांगला प्रतिसाद मिळाल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर आता ऊस पिकासाठी मोठ्या प्रमाणावर या खताचा वापर करण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे.दरम्यान, भू चैतन्य गांडूळ खत प्रकल्पाला भेट दिल्यानंतर प्रकल्प संचालकांशी त्यांची भेट झाली. यावेळी तांबे यांनी आपल्या शेतीतील अनुभव कथन केला. त्यांच्या या अनुभवाची छोटीशी मुलाखतही घेण्यात आली आहे. रासायनिक खतांचा वाढता खर्च, जमिनीचा खालावत चाललेला पोत आणि शेतीचा उत्पादन खर्च कमी करण्याचे आव्हान पाहता सेंद्रिय खतांचा वापर महत्त्वाचा ठरत आहे.

शेअर बाजार फसवणूक प्रकरणातील कवडे कुटुंबीयांना उच्च न्यायालयाचा धक्का; अटकपूर्व जामीन फेटाळला!

एक कोटी ६१ लाखांच्या आर्थिक फसवणुकीचा आरोप

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

अमरापूर : शेवगाव तालुक्यात चर्चेत असलेल्या शेअर बाजार गुंतवणूक फसवणूक प्रकरणातील आरोपी चंद्रकला कवडे, कल्याण कवडे आणि महेंद्र कवडे यांचा अटकपूर्व जामीन अर्ज मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने फेटाळला आहे. त्यामुळे जिल्हा व सत्र न्यायालयानंतर उच्च न्यायालयातूनही आरोपींना दिलासा मिळालेला नाही.

शेवगाव येथील रहिवासी अवधूत विनायक केदार यांनी मुख्य आरोपी साईनाथ कल्याण कवडे तसेच चंद्रकला कवडे, कल्याण कवडे आणि महेंद्र कवडे यांच्याविरुद्ध शेवगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. फिर्यादीसह अन्य गुंतवणूकदारांची मिळून तब्बल एक कोटी ६१ लाख ४२ हजार ९०० रुपयांची आर्थिक फसवणूक झाल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

फिर्यादीच्या तक्रारीनुसार, आरोपी साईनाथ कवडे याने 'सिटिक सोल्युशन्स' या शेअर मार्केट ट्रेडिंग कंपनीच्या माध्यमातून गुंतवणुकीवर १२ टक्के परतावा देण्याचे आश्वासन दिले होते. या आश्वासनावर विश्वास ठेवून फिर्यादीसह अनेक गुंतवणूकदारांनी मोठ्या प्रमाणावर आर्थिक गुंतवणूक केली. मात्र, ठरल्याप्रमाणे परतावा न देता गुंतवणुकीची मूळ रक्कमही परत न केल्याने फसवणूक झाल्याची तक्रार करण्यात आली. या प्रकरणी २८ ऑक्टोबर २०२४ रोजी शेवगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या गुन्ह्यातील आरोपींनी जिल्हा व सत्र न्यायालय, अहिल्यानगर येथे अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता. मात्र, फिर्यादीच्या वतीने करण्यात आलेल्या युक्तिवादानंतर न्यायालयाने तो अर्ज फेटाळला. त्यानंतर आरोपींनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात अटकपूर्व जामिनासाठी धाव घेतली होती.

या याचिकेवर उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती आर. एम. जोशी यांच्यासमोर सुनावणी झाली. यावेळी मूळ फिर्यादी अवधूत विनायक केदार यांच्या वतीने ड. प्रशांत गिरी यांनी आरोपींच्या अटकपूर्व जामिनाला जोरदार विरोध करत न्यायालयासमोर बाजू मांडली. जिल्हा व सत्र न्यायालयातील कागदपत्रे तसेच प्रकरणातील उपलब्ध बाबींचे अवलोकन करून उच्च न्यायालयाने आरोपींचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला.

या न्यायालयीन लढ्यात फिर्यादी अवधूत केदार यांच्या वतीने ॲड. प्रशांत गिरी यांनी प्रभावीपणे बाजू मांडली. त्यांना ड. पंकज खराडे यांनी जिल्हा व सत्र न्यायालयातील कामकाजात, तर ॲड. योगेश कासोद यांनी सहकार्य केले.

उच्च न्यायालयानेही अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळल्याने शेवगाव तालुक्यात चर्चेत असलेल्या या आर्थिक फसवणूक प्रकरणाला महत्त्वपूर्ण वळण मिळाले आहे.

फटाक्यांचा धूर नको; निसर्गाचा श्वास जपूया! निमगाव वाघात फटाकेमुक्त दिवाळीची शपथ

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



नगर तालुका : फटाक्यांचा धूर, ध्वनिप्रदूषण आणि पर्यावरणाची हानी टाळून निसर्गपूरक दिवाळी साजरी करण्याचा संदेश देत निमगाव वाघा (ता. नगर) येथे फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्याची सामूहिक शपथ घेण्यात आली. शहीद जवान गोरख नाना जाधव यांच्या स्मारकस्थळी हा पर्यावरण संवर्धनाचा उपक्रम उत्साहात पार पडला.

स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ, धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय आणि पै. नाना डोंगरे व्यायामशाळा यांच्या संयुक्त विद्यमाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ग्रामस्थ, युवक-युवती आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी एकत्र येत फटाकेमुक्त व पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याचा संकल्प केला. सध्या परिसरात दुष्काळाचे सावट असून पाणीटंचाईची समस्या गंभीर बनत आहे. त्यातच वाढते वायुप्रदूषण आणि ध्वनिप्रदूषण यामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत चालला आहे. सण-उत्सव साजरे करताना निसर्गाचेही भान ठेवणे काळाची गरज बनली आहे. दिवाळीचा आनंद फटाक्यांच्या आवाजात नव्हे, तर दिव्यांच्या प्रकाशात, आपुलकीत आणि सामाजिक बांधिलकीत शोधला पाहिजे, हा विचार या उपक्रमातून मांडण्यात आला.

देशासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या जवानांच्या स्मृतीला अभिवादन करत समाजाप्रती आणि पर्यावरणाप्रती आपले कर्तव्य जपण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला. यावेळी भाऊसाहेब जाधव, बापू सुंबे, पोपट भगत, रमेश कुलट, राजू डोंगरे, बाळू जाधव, उत्तम निमसे, नवनाथ जाधव, भागचंद जाधव, बापू पुंड, हुसेन शेख, बाबूभाई शेख, अजय फलके, संदीप डोंगरे, किरण ठाणगे, राजू शिंदे, भाऊ होळकर आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

श्री. मुलिकादेवी महाविद्यालय निघोज येथे राष्ट्रीय परिषदेचे आयोजन

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

निघोज : अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे, श्री मुलिकादेवी महाविद्यालय निघोज, ता. पारनेर जि. अहिल्यानगर येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत 'भारतीय ज्ञान प्रणालीबाबत बहुविद्याशाखीय दृष्टिकोन' या विषयावर दि. १० व ११ डिसेंबर २०२६ रोजी द्विदिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

या परिषदेत शिक्षण क्षेत्रातील कला, वाणिज्य, विज्ञान, संगणकशास्त्र, शिक्षणशास्त्र विधी व न्याय, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, गणित, सांख्यिकी, योगा, युनानी, सिद्ध आरोग्य आदी सर्वच ज्ञान शाखांतील प्राचीन ते अर्वाचीन भारतीय ज्ञान निर्मितीचा सखोल आढावा घेण्यात येणार आहे. भारत सरकारने इंडियन नॉलेज सिस्टीम अर्थातच भारतीय ज्ञान प्रणाली या विषयाला अधिक्रम देऊन भारतीय ज्ञान निर्मिती प्रक्रिया ही महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना अवगत व्हावी व त्यांना भारतीय ज्ञानाचे महत्त्व समजावे याकरिता या विषयाचा समावेश राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात नव्याने करण्यात आला आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थी व संशोधकांनाही राष्ट्रीय पातळीवरील भारतीय ज्ञानपरंपरेबाबत अधिकाधिक माहितीचे स्रोत खुले व्हावे व एक व्यासपीठ मिळावे या उद्देशाने महाविद्यालयाने ही राष्ट्रीय परिषद आयोजित केली आहे. या परिषदेत भारतभरातून संशोधकांनी जास्तीत जास्त संख्येने सहभाग नोंदवावा व या मेलवर दि. २० नोव्हेंबर २०२६ पर्यंत शोधनिबंध पाठवावेत असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सहदेव आहेर यांनी केले आहे. या परिषदेचे उद्घाटन पद्मश्री डॉ. पोपटराव पवार, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे. या परिषदेत डॉ. अशोक चव्हाण, डॉ. बाळासाहेब सागडे, डॉ. सुभाष पवार, डॉ. श्रीकांत माने, डॉ. संतोष पागिरे, डॉ. उत्तम पठारे, डॉ. कैलाश दुडी, डॉ. पी. माधवी आदी मान्यवर प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत. याप्रसंगी भारतभरातील संशोधकांद्वारे शोधनिबंध सादर केले जातील. या सादरीकरणात उत्कृष्ट प्रथम तीन शोधनिबंध वाचकांस डॉ. अशोक चव्हाण फाउंडेशनच्या वतीने सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे, अशी माहिती परिषदेचे समन्वयक प्रा. विशाल रोकडे, प्रा. मनिषा गाडीलकर, प्रा. सचिन निघूट, डॉ. पोपट पठारे व डॉ. अक्षय अडसूळ यांनी दिली.

वाळवणे सोसायटीकडून सभासदांना प्रथमच १० टक्के लाभांश वाटप

खा. नीलेश लंके यांच्या हस्ते वितरण

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



सुपा : श्री भैरवनाथ वाळवणे विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित, वाळवणे या संस्थेच्या इतिहासात प्रथमच सभासदांना १० टक्के लाभांश वाटप करण्यात आले. खासदार नीलेशजी लंके यांच्या शुभहस्ते या लाभांशाचे वितरण करण्यात आले. तसेच अहमदनगर जिल्हा सहकारी बँकेच्या संचालकपदी निवड झाल्याबद्दल खासदार नीलेश लंके यांचा वाळवणे ग्रामस्थ, वाळवणे सोसायटी, ग्रामपंचायत आणि परिसरातील विविध संस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन सुभाष कुंडलिक थोरात होते. यावेळी बोलताना खासदार नीलेश लंके यांनी अनेक वर्षांपासून अडचणीत असलेली संस्था आता नफ्यात आल्याबद्दल संचालक मंडळाचे विशेष अभिनंदन केले.

संस्थेचे सचिव चंदन भाऊसाहेब यांनी सभासदांना संस्थेचे महत्त्व आणि हित समजावून सांगितले. त्यामुळे सभासदांनी जागरूक राहून कर्जाची नियमित परतफेड केली. याचा सकारात्मक परिणाम म्हणून संस्थेला चालू वर्षात तब्बल १२ लाख ५२ हजार रुपयांचा नफा झाला. संस्थेच्या या प्रगतीचे खासदार लंके यांनी कौतुक केले.

खासदार नीलेश लंके यांची जिल्हा सहकारी बँकेच्या संचालकपदी निवड झाल्याने वाळवणे सोसायटी, वाळवणे ग्रामपंचायत, समस्त ग्रामस्थ तसेच परिसरातील विविध संस्थांच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी श्रीगोंदा नगर परिषदेचे नगराध्यक्ष मनोहर पोटे, ठकाराम लंके, भोगाडे सर, लाला भोंडवे, प्रकाश गुंड, निलेश लंके प्रतिष्ठानचे पदाधिकारी, परिसरातील विविध संस्थांचे चेअरमन, सरपंच तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण! खासदार नीलेश लंके यांच्याकडून सचिन आप्पा पठारे यांच्या जिल्हा परिषद उमेदवारीची घोषणा! वाळवणे येथील कार्यक्रमात खासदार नीलेश लंके यांनी युवा नेते सचिन आप्पा पठारे यांच्या जिल्हा परिषद उमेदवारीची घोषणा करून उपस्थितांचे लक्ष वेधले. तसेच आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सचिन आप्पा पठारे यांच्या पाठीशी गावाने एकजुटीने आणि खंबीरपणे उभे राहावे, असे आवाहन केले. या घोषणेमुळे वाळवणे परिसरातील राजकीय चर्चांना नवे वळण मिळाले आहे.

दैनिक
राष्ट्रसह्याद्री
रविवार, दि.०८ नोव्हेंबर २०२६ । पान ८

अशोक सहकारी साखर कारखाना लि., अशोकनगर

पो. कारेगाव फॅक्टरी, ता.श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर - ४१३ ७१७

श्रम ही आमची प्रतिष्ठा। सहकार हेच आमचे वैभव।। धरणे-बंधारे ही आमची मंदिरे। पाणी हेच आमचे दैवत।।

व्हा. चेअरमन



मान.श्री.आदिनाथ झुराळे

लोकनेते
मान.श्री.भानुदास मुरकुटे
यांचे नेतृत्त्वाखाली
अशोक उद्योग समूहाची
उज्वल भविष्याकडे
वाटचाल...!

चेअरमन



मान.श्री.भानुदास मुरकुटे
चार्टर्ड अकौंटंट
(माजी आमदार)

* जलसंवर्धनाचा पथदर्शक 'अशोक बंधारे' प्रकल्प
* प्रतिदिनी ४० हजार लिटर्स व ६० हजार लिटर्स क्षमतेचा आसवनी व इथेनॉल प्रकल्प
* अशोक इन्स्टिट्युट ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी (डिप्लोमा ॲण्ड डिग्री), अशोकनगर
* अशोक कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय, अशोकनगर
* अशोक इंग्लिश मिडीयम स्कूल व ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स ॲण्ड कॉमर्स (स्टेट बोर्ड), प्रगतीनगर
* भास्करराव गलांडे पाटील औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आय.टी.आय.), अशोकनगर
* अशोक कॉलेज ऑफ फार्मसी (डी फार्मसी ॲण्ड बी फार्मसी), अशोकनगर
* अशोक आयडियल स्कूल (सी.बी.एस.ई.), प्रगतीनगर

१५ मेगावॅट क्षमतेचा सहवीज निर्मिती प्रकल्प सन २०१३-१४ च्या हंगामात कार्यान्वित

श्री.रावसाहेब थोरात	श्री.कोंडीराम उंडे	श्री.सोपानराव राऊत
श्री.हिम्मतराव धुमाळ	श्री.पुंजाहरी शिंदे	श्री.भाऊसाहेब उंडे
श्री.बाबासाहेब आदिक	श्री.ज्ञानदेव पटारे	श्री.रामभाऊ कसार
श्री.यशवंत बनकर	श्री.विरेश गलांडे	श्री.ज्ञानेश्वर शिंदे
श्री.ज्ञानेश्वर काळे	श्री.अमोल कोकणे	श्री.यशवंत रणनवरे
श्री.प्रफुल्ल दांगट	श्री.योगेश विटनोर	सौ.हिराबाई साळुंके
सौ.शितलताई गवारे	श्री.निरज मुरकुटे	श्री.अच्युतराव बडाख
श्री.वसंतराव भांड	श्री.पोपट नवले	श्री.संतोष देवकर
(कार्यलक्षी संचालक)	(कार्यलक्षी संचालक)	(कार्यकारी संचालक)

मान.प्रादेशिक सह संचालक (साखर), अ.नगर तसेच सभासद, अधिकारी व कर्मचारी परिवार

फोन नंबर : (०२४२२) २४६४९१, ९१३००१७४९३ E-mail : ashokssk_anr@yahoo.co.in

GODAVARI BIOREFINERIES LTD.

हार्दिक शुभेच्छा

We are a Biorefining company producing sugar, chemicals and waxes

Register Office •
Somaiya Bhawan, 45-47, MG Road, Post box no. 384,
Fort, Mumbai-400023 Ph. no.022-22048272&, 22858430
Factory
1. Po, Sakarwadi-423, Tal-Kopargaon, Dist-Ahmednagar (M.S.)
2. Sameerwadi (via Mahalingpur), Dist. Bagalkot, Karnataka

दिवाळी व दीपावली पाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा...

वैजापुर नगरपरिषद, वैजापूर

जाहीर आवाहन : वैजापूर शहरातील सर्व नागरिक, व्यावसायिक, दुकानदार व आस्थापनाधारक यांना जाहीर आवाहन करण्यात येते की, वैजापूर नगरपरिषदेच्या वतीने स्वच्छ भारत अभियान २.०, जलसंवर्धन व पाणी बचत तसेच माझी वसुंधरा अभियान ७.० अंतर्गत विविध जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहेत. अल निनोचा संभाव्य प्रभाव व दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता खालील वावीचे पालन करून नगरपरिषद प्रशासनास सहकार्य करावे.

१. स्वच्छ भारत अभियान २.० व प्लास्टिकमुक्त वैजापूर
- घरगुती कचरा घंटागाडीत देताना ओला, सुका, सॅनिटरी व घरगुती घातक कचरा अशा चार प्रकारांत विलगीकृत करूनच द्यावा.
- कचरा उघड्यावर टाकू नये, सार्वजनिक ठिकाणे, रस्ते व परिसर स्वच्छ ठेवावा.
- एकल वापर प्लास्टिकचा वापर टाळून कापडी व कागदी पिशव्यांचा वापर करावा. जुन्या कपड्यांपासून कापडी पिशव्या तयार करून वापराव्यात.

२. जलसंवर्धन व पाणी बचत
- पिण्याचे पाणी वाहने व रस्ते धुण्यासाठी वापरू नका. पाण्याचा काटकसरीने वापर करा.
- घरातील वापरलेल्या पाण्याचा शक्यतो पुनर्वापर करून झाडांना द्यावे.
- सार्वजनिक तलाव, जलाशय व जलस्रोतांमध्ये कचरा किंवा प्लास्टिक टाकू नका. जलाशयाची स्वच्छता व संवर्धन करा.
- पाण्याची गळती त्वरित दुरुस्त करून प्रत्येक थेंब वाचवा.
- पाणी वाचवा - जीवन वाचवा! झाडे लावा - झाडे जगवा!

३. माझी वसुंधरा अभियान ७.० व पर्यावरण संवर्धन
- आकाश, वायु, अग्नी, जल व पृथ्वी या पंचमहाभूतांचे संरक्षण व संवर्धन करा.
- जास्तीत जास्त झाडे लावा व त्याचे संगोपन करा.
- सौरऊर्जेचा व इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढवा. फटाक्यांचा अतिवापर टाळून ध्वनी व वायुप्रदूषणमुक्त पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करा.
- घर, दुकान व व्यावसायिक आस्थापनांमध्ये अग्निसुरक्षेच्या नियमांचे पालन कार. गॅस सिलिंडर व विद्युत उपकरणे वापरताना आवश्यक ती काळजी घ्या.

अधिक माहितीसाठी : पाणीपुरवठा विभाग, स्वच्छता विभाग व अग्निशमन विभाग वैजापुर नगरपरिषद यांच्याशी संपर्क साधावा.


वी. यु. बिगोत (राजपूत)	शेख रियाज अकील	डॉ. दिनेश पी. परदेशी
मुख्याधिकारी	उपनगराध्यक्ष	नगराध्यक्ष
वैजापूर नगरपरिषद	वैजापूर नगरपरिषद	वैजापूर नगरपरिषद

दिवाळी व दीपावली पाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा...

समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्युट संचलित

समर्थ ग्रुप ऑफ इन्स्टिट्युशन्स,बेल्हे

इंजिनिअरींग B.E., M.E., MCA	पॉलिटेक्निक Diploma	आयुर्वेदिक कॉलेज BAMS
फार्मसी D.Pharm, B.Pharm, M.Pharm	कॉम्प्युटर सायन्स B.Sc., M.Sc.(Computer)	नर्सिंग G.N.M, B.Sc., Nursing
मॅनेजमेंट MBA, BBA	इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी B.Sc(IT),B.Sc(Cyber Security)	आय.टी.आय. Admission After 10th Courses
लॉ कॉलेज B.A.LLB, LLB, DTL, DLL&LW	ज्युनिअर कॉलेज 11th/12th Science & Commerce	इंग्लिश मिडियम स्कुल English Medium School (CBSE)



9766588077
9637238034

कल्याण-अहिल्यानगर महामार्गावर, मु.बांगरवाडी, पो.बेल्हे, ता.जुन्नर, जि.पुणे-४१२४१०

sibmbelhe@rediffmail.com
www.samarthinstitute.edu.in

दीपावलीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा...



संग्राम नागरी सहकरी पतसंस्था मर्यादित, संगमनेर

मुख्यालय : श्री छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ, महसूल निवास, संगमनेर, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर
शाखा : बडगाव पान, आश्वी बु।, नंदीहिल (SMBT), टॉप टेन - विस्तार कक्ष ०२४२५-२२६०४६ ९७४२९३०९३०

आजची गुंतवणूक, उद्याचे उज्वल भविष्य .....
- मुदत ठेव - ४६ ते ३६४ दिवस - ७ % १ वर्ष ते २ वर्ष - ७.५० %
- रिकरिंग ठेव - व्याज -७.५०%
- उद्दिष्टपुर्ती ठेव - १३ महिने - ८.५० %
- अक्षय ठेव - २५५ दिवस - ८.७५ %
- पेन्शन ठेव योजना - एकरकमी रु. १,००,०००/- गुंतवा दरमहा रु. ६६७/- पेन्शन मिळवा.
- दामदुप्पट योजना - १११ महिन्यात दामदुप्पट

आर्थिक स्थिती दि. ३०/०९/२०२६ अखेर

भाग भांडवल	१ कोटी ८८ लाख
ठेवी	१७७ कोटी ०८ लाख
कर्ज	१४० कोटी १२ लाख
गुंतवणूक	६० कोटी ४७ लाख
स्वनिधी	३२ कोटी ४८ लाख
एकत्रित व्यवसाय	३१७ कोटी २० लाख
खेळते भांडवल	२१५ कोटी ९० लाख
नफा	३ कोटी ४१ लाख

(३१/०३/२०२६ अखेर)



मुख्यालय पत्ता- तहसील कार्यालय रोड, कवी आनंद फंदी नाट्यगृहाजवळ, संगमनेर

डॉ. सुधीर तांबे संस्थापक | श्री. राणीप्रसाद मुंदडा चेअरमन | इंजि. विजय गिरी व्हा. चेअरमन

मा. संचालक मंडळ

डॉ. नाजिमुद्दीन शेख	श्री. विलास दिघे	डॉ. माणिकराव शेवाळे
श्री. सुर्यकांत शिंदे	श्री. नानासाहेब वर्पे	श्री. दत्तात्रय आरोटे
श्री. श्रीकांत कोकणे	श्री. सुदिप वाकळे	श्री. उमेश बोटकर
डॉ. सुचित गांधी	श्री. सोमेधर दिवटे	ॲड. प्रशांत गुंजाळ
सौ. सुलभाताई दिघे	सौ. सुनंदाताई दिघे	श्री. अनिल सातपुते
सी. ए. अमित कलंत्री		श्री. उमेश शिंदे-व्यवस्थापक
श्री. प्रकाश गुंजाळ -व्यवस्थापकीय सल्लागार		

शुभेच्छुक : सर्व संचालक, अधिकारी व कर्मचारी वृंद

